
गुरुवार, १९ जानेवारी २०२३
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १८२
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

खून प्रकरणातील आरोपींना खारघरमध्ये बेड्या/३
माणगाव रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन/५
तायक्वांदो पुमसेत रायगडला सांघिक अजिंक्यपद/८

## राज्यातील पालिकांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर



**नवी दिल्ली** : मुंबई महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर गेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात प्रलंबित असलेल्या याचिकांवर आता फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होणार आहे. न्यायालयाने पुढील महिन्यात निवडणुकांना हिरवा कंदील दाखविला, तर एप्रिल-मेमध्ये त्या होऊ शकतील. अन्यथा पावसाळ्यामुळे त्या आणखी लांबणीवर जाण्याची चिन्हे आहेत. महाविकास आघाडी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभाग व सदस्यांची संख्या वाढविण्याचा घेतलेला निर्णय, प्रभागरचना निश्चित करण्याचा अधिकार राज्य सरकारकडे घेण्याचा निर्णय, प्रभाग व सदस्य संख्या पुन्हा पूर्ववत करण्याचा शिंदे-फडणवीस सरकारचा निर्णय, ९२ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण ठेवायचे की नाही या मुद्द्यासह काही बाबींवर सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई नगरीत

### विविध विकासकामांचे होणार उद्घाटन आणि भूमिपूजन

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबईतील विविध विकासकामांच्या उद्घाटन आणि नव्या प्रकल्पांच्या भूमिपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी (दि. १९) मुंबईत येत आहेत. या दौऱ्यात वांद्रे कुर्ला संकुलातील मैदानात पंतप्रधान मोदींची सभा होणार आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने पंतप्रधानांना हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

पंतप्रधान मोदी हे त्यांनीच काही वर्षांपूर्वी पायाभरणी केलेल्या मुंबई मेट्रोच्या मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ या मार्गांचे लोकार्पण करणार असून त्यानंतर ते मुंबई मेट्रोने प्रवासही करणार आहेत. यासह ते ३८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करतील. मुंबईतील सर्व मेट्रो, लोकल आणि बससाठी चालू शकणाऱ्या मुंबई वन मोबाईल ॲप आणि नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते होईल.

१७ हजार २०० कोटी रुपयांच्या सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होईल. मालाड, भांडुप, वर्सोवा, घाटकोपर, वांद्रे, धारावी, वरळी येथे हे प्रकल्प उभारले जातील. त्यांची एकत्रित क्षमता २४६० एमएलडी आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना २० ठिकाणी उघडला जात असून त्याचे उद्घाटन पंतप्रधान मोदी करतील. तेथे आरोग्य तपासणी, औषधोपचार, रोगनिदान व तपासणी या गोष्टी विनामूल्य होतील. ३६० खाटांचे भांडुप मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल, गोरेगावचे सिद्धार्थ नगर हॉस्पिटल (३०६ खाटा) व ओशिवरा मॅटर्निटी होम (१५२ खाटा) यांची पायाभरणीही पंतप्रधान करतील.

याशिवाय ऐतिहासिक अशा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या (सीएसएमटी) पुनर्विकासाची पायाभरणी पंतप्रधान मोदींच्या हस्ते करण्यात येणार आहे. यासाठीचा प्रस्ताव मध्य रेल्वेने केंद्राकडे पाठवला होता. पुनर्विकासाचा एकूण खर्च एक हजार ८१३ कोटी रुपये आहे.

पंतप्रधानांसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्य मंत्री, प्रमुख नेते, वरिष्ठ अधिकारी उपस्थित असणार आहेत.

### महाराष्ट्रात एक लाखाहून अधिक रोजगार निर्मिती होणार

# दावोसमध्ये कोट्यवधींचे सामंजस्य करार

**दावोस : वृत्तसंस्था**


स्वित्झर्लंडमधील दावोस येथे गेल्या दोन दिवसांत विविध उद्योगांशी एक लाख ३७ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. पहिल्यांदाच महाराष्ट्राचे इतक्या मोठ्या संख्येने तेथे करार झाल्यामुळे देशी-विदेशी गुंतवणूकदारांचा राज्यावर विश्वास असल्याचे दिसते, असे सांगून या गुंतवणूकदारांचे प्रकल्प लवकरात लवकर सुरू होतील. राज्यात उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण असून उत्तम पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ आहे. त्यामुळे उद्योजकांना मॅग्नेटीक महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची संधी असून दावोसमध्ये महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत गुंतवणूक करण्यासाठी उद्योजकांनी पसंती दर्शवली आहे. यातून राज्यातील एक लाखांहून तरुणांना रोजगार मिळेल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशाची आणि महाराष्ट्राची छाप या आर्थिक परिषदेत दिसून आली. महाराष्ट्राच्या विविध औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक झाली असून त्यामध्ये हायटेक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात सहा कंपन्यांसोबत ५४ हजार २७६ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार झाले आहे. त्याद्वारे ४३०० रोजगार निर्माण होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

ऊर्जा क्षेत्रातील नविनीकरणीय ऊर्जा आणि इलेक्ट्रीकल व्हेईकल क्षेत्रात ४६ हजार ८०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्या माध्यमातून ४५ हजार रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

माहिती तंत्रज्ञान (आयटी), फिनटेक, डेटा सेंटर या क्षेत्रामध्ये ३२ हजार ४१४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले असून ८७०० जणांना रोजगार मिळणार आहे. लोह उत्पादन क्षेत्रात २२०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून तीन हजार जणांना रोजगार मिळणार आहे. कृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्रामध्ये १९०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले असून त्यामुळे सुमारे ६०० जणांना रोजगार मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्रात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांनी विश्वास दाखविल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे आभार मानत त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

### मुख्यमंत्र्यांची माहिती



### उद्योगवाढीला चालना देण्यासाठी नवीन धोरण

राज्य शासनामार्फत जनतेच्या हिताच्या निर्णयासोबतच उद्योगवाढीला चालना मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सदस्यांनी उद्योजकांसाठी नवीन धोरण ठरविले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी सांगितले. नवीन धोरणामध्ये एक खिडकी योजना, भांडवली अनुदान, जीएसटी कर अनुदान त्याचबरोबर नवीन तंत्रज्ञान आणि मोठ्या उद्योगांना विशेष पॅकेज देण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी याबाबत बोलताना दिली.

### सामंजस्य करारांची एकत्रित माहिती

- पुणे : रुखी फूड्स-ग्रीन फिल्ड अन्न प्रक्रिया प्रकल्प (२५० कोटी गुंतवणूक)
- पुणे : निप्रो कार्पोरेशन (जपान)-ग्लास ट्युबिंग प्रकल्प (१,६५० कोटी गुंतवणूक व दोन हजार रोजगार)
- पुणे : पिंपरी-एलाईट प्लास्ट अँटो सिस्टीम्स (पोर्तुगाल)-प्लास्टिक ऑटोमोटिव्ह प्रकल्प (४०० कोटी गुंतवणूक व दोन हजार रोजगार)
- मुंबई : इंड्स कॅपिटल पार्टनर्स-आरोग्य, तंत्रज्ञान, संरक्षण सेवा (१६ हजार कोटी गुंतवणूक)
- औरंगाबाद : ग्रीनको-नवीनीकरण ऊर्जा (रिन्युएबल एनर्जी) प्रकल्प (१२ हजार कोटी गुंतवणूक व ६,३०० रोजगार)
- चंद्रपूर : भद्रावती-न्यू एरा क्लीनटेक सोल्युशन (अमेरिका) कोल गॅसिफिकेशन प्रकल्प (२० हजार कोटी गुंतवणूक व १५ हजार रोजगार)
- चंद्रपूर : मूल-राजुरी स्टील अँड अलाईज (इस्राईल) स्टील प्रकल्प (६०० कोटी गुंतवणूक व एक हजार रोजगार निर्मिती)
- गडचिरोली : चार्मिशी-वरद फेरो अलाईज स्टील प्रकल्प (१,५२० कोटी गुंतवणूक व दोन हजार रोजगार निर्मिती)
- महाराष्ट्र : गोगोरो इंजिनीअरिंग बडवे इंजिनीअरिंग ऑटो प्रकल्प (२० हजार कोटी गुंतवणूक व ३० हजार रोजगार)
- महाराष्ट्र : बर्कशायर हाथवे नागरी पायाभूत सुविधा (१६ हजार कोटी गुंतवणूक)
- महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल (१० हजार कोटी गुंतवणूक व तीन हजार रोजगार)
- लक्झम्बर्ग इन्व्हेस्टमेंट कंपनी (१२ हजार कोटी गुंतवणूक व १,२०० रोजगार)
- हंस इन्फ्रोसोल्युशन प्रा. लि. वूडवीन (चार हजार कोटी गुंतवणूक व ८०० रोजगार)
- मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर येथे जपानच्या निप्पॉन टेलेग्राफ एंड टेलिफोन-डेटा सेंटर्स (२०,४१४ कोटी गुंतवणूक व १५२५ रोजगार)

**नॉलेज पार्टनरशिपसाठी करार**

- दावोस येथे महाराष्ट्रात नॉलेज पार्टनरशिपसाठीदेखील विविध सामंजस्य करार करण्यात आले.
- मुंबई महानगर-कॅलिफॉर्निया विद्यापीठ (बर्कले)समवेत स्मार्ट सिटी सामंजस्य करार
- वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसमवेत नागरी परिवर्तनासाठी सामंजस्य करार
- वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसमवेत न्यू इकॉनॉमी एंड सोसायटी साठी सामंजस्य करार
- स्विस इंडिया चेंबर ऑफ कॉमर्ससमवेत गुंतवणूक आणि व्यापारविषयक सहकार्यासाठी सामंजस्य करार

## निवडक

### युक्रेनमध्ये हेलिकॉप्टर अपघात; गृहमंत्र्यांसह १६ जणांचा मृत्यू

**कीव** : युक्रेनची राजधानी कीव येथे हेलिकॉप्टरचा भीषण अपघात होऊन गृहमंत्र्यांसह १६ जणांचा मृत्यू झाला. हे हेलिकॉप्टर एका इमारतीला आदळले आणि त्यानंतर हेलिकॉप्टरने पेट घेतला. युक्रेनचे राष्ट्रीय पोलीस प्रमुख इगोर क्लेमेंको यांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांमध्ये गृहमंत्री डेनिस मोनास्टिरस्की यांच्यासह दोन लहान मुले आणि काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे, तर २२ जण जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### नवाब मलिक यांच्या मुलाविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई** : व्हिसासाठी बनावट कागदपत्र सादर केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री नवाब मलिक यांच्या मुलाविरूद्ध कुर्ला पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फराज मलिक असे आरोपीचे नाव असून त्याने काही दिवसांपूर्वी मैत्रिणीच्या व्हिसासाठी काही बनावट कागदपत्र सादर केली होती.

# स्व. एन. डी. पाटील यांचे कार्य आदर्शवत

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



(छाया : संकेत भोईर)



**कराड : रामप्रहर वृत्त**

लढवय्ये नेते आणि ज्येष्ठ विचारवंत दिवंगत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला तर आयुष्यात मोठे झाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. ते मंगळवारी (दि. १७) कराड येथे आयोजित स्मृतिदिन कार्यक्रमात बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेच्या कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये संस्थेचे माजी चेअरमन दिवंगत एन. डी. पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर, सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. रवींद्र पवार, माजी आमदार आनंद पाटील, जनरल बॉडी सदस्य किसन पाटील-घोणसीकर, ॲड. सदानंद चिंगळे, डॉ. दिलीपकुमार कसबे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, उपप्राचार्य एस. ए. पाटील, प्रा. डॉ. कोमल कुंदप, मुबीन हारुन मुजावर यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. मान्यवरांनी 'एनडीं'च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. **(पान २ वर..)**

# पुण्यात पोटनिवडणूक जाहीर

### २७ फेब्रुवारी रोजी मतदान, २ मार्चला मतमोजणी

**पुणे : प्रतिनिधी**

भाजप आमदार मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अनुक्रमे कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या दोन जागांसाठी येत्या २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक घेण्यात येईल, तर २ मार्चला मतमोजणी होणार आहे.

या पोटनिवडणुकीसाठी ३१ जानेवारी रोजी अधिसूचना जारी होईल. अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत ७ फेब्रुवारी, अर्जांची छाननी ८ फेब्रुवारी, १० फेब्रुवारीपर्यंत माघार, २७ फेब्रुवारी रोजी मतदान आणि २ मार्च रोजी मतमोजणी होणार आहे.

कोणत्याही आमदार वा खासदाराचे निधन झाल्यास विरोधकांकडून त्या जागेवर उमेदवार उभा केला जात नाही, तर त्या जागेची निवडणूक बिनविरोध होत असते. तसा महाराष्ट्रात प्रघात आहे. त्यामुळे या दोन जागांवरील निवडणूक बिनविरोध होणार का याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा बिगूल वाजला

### त्रिपुरा, नागालँड, मेघालयमध्ये उडणार राजकीय धुरळा

**नवी दिल्ली** : गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यांतील विधानसभा निवडणुकीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने उत्तर पूर्वेतील तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली आहे. त्रिपुरा, नागालँड, मेघालय या राज्यात ही निवडणूक होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार त्रिपुरा राज्यात १६ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे, तर २७ फेब्रुवारी रोजी नागालँड आणि मेघालयमध्ये मतदान होईल. या तिन्ही राज्यांच्या निवडणुकीचा निकाल २ मार्च रोजी जाहीर करण्यात येणार आहे. निवडणुकीची घोषणा होताच तिथे आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.




**हैदराबाद : टीम इंडियाचा युवा सलामीवीर शुबमन गिलने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात धडाकेबाज द्विशतक ठोकले. अशी कामगिरी करणारा तो सर्वांत तरुण भारतीय फलंदाज ठरला. यासह वनडेत सर्वांत जलदगतीने एक हजार धावा पूर्ण करणारा तो जगातील दुसरा, तर पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.**

# आजपासून उरण महोत्सवाची धूम

### मान्यवर, कलाकारांची लाभणार उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

उरण येथे महेश बालदी मित्र मंडळ, वूमन ऑफ विस्डम, स्टेप आर्ट कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उरण, स्टॉर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उरण महोत्सव २०२३चे आयोजन करण्यात आले आहे. उरण कोटनाका मैदानावर १९ ते २२ जानेवारीदरम्यान सायंकाळी ६ ते रात्री १०पर्यंत हा महोत्सव रंगणार आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १९) रात्री ७ वाजता होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन समारंभानंतर सोलो डान्स (एकेरी नृत्य) स्पर्धा होईल.

या महोत्सवांतर्गत २० जानेवारीला स्टॉर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्टचे संस्थापक अध्यक्ष सिद्धेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शरीरसौष्ठव स्पर्धा घेण्यात येणार आहे. २१ रोजी जल्लोष सुवर्णयुगाचा व सायंकाळी ७.३० वाजता सोनी मराठी चॅनेलवरील महाराष्ट्राची हास्यजत्रा विनोदी कार्यक्रम फेम कलाकारांची उपस्थिती लाभणार आहे, तसेच ८ किट्स (अंक) सादर करणार आहेत. २२ तारखेला सायंकाळी ७ वाजता मराठी अभिनेत्री तथा नृत्यांगना मानसी नाईकची उपस्थिती असेल व समूह नृत्य स्पर्धा होणार आहे.

महोत्सवासाठी भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, स्टेप आर्ट कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष पप्पू सूर्यराव, वूमन ऑफ विस्डमचे संस्थापक अध्यक्ष सारिका पाटील, स्टॉर्म फिटनेस आणि मिक्स मार्शल आर्टचे संस्थापक अध्यक्ष सिद्धेश शिंदे यांचे सहकार्य लाभत आहे.

अधिक माहितीसाठी पप्पू सूर्यराव (९८२१६२५३६२), पंकज जाधव (७०२१५०४५७५), गणेश म्हात्रे (९८३३७८०७१५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अभीष्टचिंतन!



**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांना वाढदिवसानिमित्त बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.** (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

## निवडक

### धरणा कॅम्पमध्ये बेवारस महिलेचा मृत्यू

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धरणा कॅम्प येथील शिवसेना शाखेच्या गेटजवळ एक अनोळखी बेवारस महिला बेशुद्ध अवस्थेत आढळली होती. या महिलेला उपचार करीत पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तिला डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या मयत महिलेचे अंदाजे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, रंग सावळा, बांधा मध्यम, केस काळे भुरकट, नाक सरळ, चेहरा उभट, अंगात मेंहदी कलरचा शर्ट, मरून रंगाची हाफ पॅन्ट आहे. या महिलेबाबत कोणाला काही अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाण्याची संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कळंबोलीतून महिला बेपत्ता



**पनवेल :** कळंबोली येथून एक महिला कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. ती हरवली असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. करुणा चेतन पोवळे (वय २६) असे या महिलेचे नाव आहे. उंची अंदाजे ५.२ फुट, रंग गोरा, चेहरा उभट, डोळे काळे, केस काळे, नाक सरळ, बांधा सडपातळ, अंगात हिरवा टॉप व हिरवी लेगीज पॅन्ट, गळ्यात काळ्या मण्यांचे मंगळसूत्र, हातामध्ये सोन्याची अंगठी, बॅग त्यामध्ये शैक्षणिक कागदपत्रे सोबत एमआय कंपनीचा मोबाईल असून तिला मराठी व हिंदी इंग्रजी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२२४७२३००) किंवा पोलीस नाईक एस. व्ही. मासुळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नागेंद्र म्हात्रे यांचा राजीनामा



**उरण :** सामाजिक कार्यकर्ते तथा न्हावा शेवा सीएचए संघटनेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी सलग चार वर्ष बिनविरोध निवड झाल्यानंतर मात्र यंदाच्या नवीन वर्षात त्यांनी स्वइच्छेने राजीनामा दिला आहे. त्यांनी गेली चार वर्ष उत्तम कामगिरी करत कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार न करता संघटना मजबूत करण्यासाठी सीएचए आधार चषक आयोजन करून आणि नियमावली बनवून आपले उत्तम योगदान संघटनेला दिले आहे. नवीन चेहऱ्यांना, नवीन सदस्यांना न्हावा शेवा सीएचए संघटनेचे अध्यक्ष पद मिळाले पाहिजे या हेतूने तसेच सर्वांना समान संधी व समान न्याय मिळाले पाहिजे या हेतूने आपण अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असल्याचे उरणमधील सामाजिक कार्यकर्ते तथा न्हावा शेवा सिएचए संघटनेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी सांगितले.

# खून प्रकरणातील आरोपींना खारघरमध्ये बेड्या

## उत्तर प्रदेशमध्ये गुन्हा करून पळालेल्या चौकडीला पनवेल गुन्हे शाखेकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

उत्तरप्रदेश राज्यातील देल्हूपूर पोलीस ठाणे हद्दीत एका व्यक्तीचा खून करून चार आरोपी फरार झाले होते. त्या आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने खारघर येथून शिताफीने अटक करून त्यांना गुन्हयाच्या पुढील तपासकामी देल्हूपूर पोलिसांच्या पथकाच्या ताब्यात दिले आहे.



उत्तरप्रदेश राज्यातील जिल्हा प्रतापगढ मधील देल्हूपूर पोलीस ठाणे हद्दीत वकिल अहमद उर्फ पप्पु (वय ४५ वर्षे, रा. तौकलपुर, जि. प्रतापगढ) यांचा आरोपींसोबत पुर्वीपासून वाद होता. त्यादरम्यान अहमद यांचा भाऊ रकिब व भाचा असफाक मोटरसायकलवरून देल्हूपुर बाजारातून घरी जात असताना आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून हातात लाठ्याकाठ्या, लोखंडी सळई घेवून रिकीब व असफाक यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने कारने रकिब व असफाक यांच्या मोटरसायकलला ठोकर मारून त्यांना मारहाण केली. तसेच अग्निशस्त्राने फायर करून त्यांना दुखापती केल्या व जिवे ठार मारण्याची धमकी देवून तेथून पळुन गेले.

या गुन्ह्यातील जखमी रकिब हा दवा उपचारादरम्यान मयत झाला. खुनासारख्या गंभीर गुन्ह्यातील हे आरोपी फरार झाले. ते नवी मुंबई परिसरात वास्तव्यास असल्याबाबत माहिती मिळाल्याने या आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वेगवगेळे पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला. गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध घेत असताना गुन्ह्यातील चार आरोपी हे खारघरमध्ये असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार खारघर सेक्टर ८ येथे जावून सापळा लाऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले.

इम्रान असीर खान (वय ३०), मोहम्मद सलमान असीर खान(वय २९), गुफारान असीर खान (वय २०) मोहम्मद मुजीद इब्रार अली (वय २२) अशी या आरोपींची नावे आहेत. त्यांना पुढील तपासकामी देल्हूपुर पोलीस ठाणे, उत्तरप्रदेश येथील पोलीस उप निरीक्षक राकेश चौरसीया व त्यांच्या पोलीस पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

ही कारवाई नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, सहाय्यक निरीक्षक प्रवीण फडतरे, संदिप गायकवाड, उपनिरीक्षक मानसिंग पाटील, वैभवकुमार रोंगे, हवालदार ज्ञानेश्वर वाघ, मधुकर गडगे, सचिन पवार, अनिल पाटील, प्रशांत काटकर, रमेश शिंदे, रणजित पाटील, अजित पाटील, तांडेल, निलेश पाटील, रूपेश पाटील, इंद्रजित कानु, दीपक डोंगरे, सागर रसाळ, राहुल पवार, नाईक आजिनाथ फुंदे, प्रफुल्ल मोरे, शिपाई संजय पाटील, प्रवीण भोपी, विक्रांत माळ, अभय मेर्या, नंदकुमार ढगे यांनी केली आहे.

## कामोठ्यातील दुकानातून लॅपटॉपसह रोख रक्कम पळवणारा चोरटा अटकेत



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर १९ येथील ऑलमोस्ट फेमस या दुकानातून लॅपटॉप व ६,००० रुपये चोरणाऱ्याला पोलिसांनी सीसीटीव्ही तपासून बेड्या ठोकल्या आहेत. मिथुन मोजलीस सिकदर असे आरोपीचे नाव असून तो फिरस्ता आहे.

आरोपीचा शोध सुरू असताना तो खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात चोरीचा लॅपटॉप विक्री करण्यासाठी आला असल्याबाबत गोपनीय बातमी प्राप्त झाली होती. मिळालेल्या गोपनीय बातमीप्रमाणे खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचून मिथुन मोजलीस सिकदर (वय २६ वर्ष, रा. कातकरवाडी कळंबोली) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून नमूद गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडून एकूण ५७,५५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी सराईत गुन्हेगार असून कामोठे, तळोजा, कळंबोली खांदेश्वर खारघर या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहेत. त्याच्या अटकेमुळे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## ट्रकच्या चाकाखाली येऊन कळंबोलीत ज्येष्ठाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

ठाणे येथून कळंबोली येथील रेल्वे यार्डमध्ये जाणाऱ्या १२ चाकी बल्कर ट्रकच्या पाठीमागील चाकामध्ये आल्याने एका ६५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना मुंब्रा-पनवेल मार्गावर फुडलँड कंपनीजवळ घडली.

कळंबोली पोलिसांनी या अपघातातील ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल करून राजपत्रात त्याला ताब्यात घेतले आहे. नालासोपारा येथे राहणारा ट्रकचालक राजेश यादव हा रविवारी सायंकाळी ठाणे येथून १२ चाकी टाटा बल्कर ट्रक घेऊन कळंबोली येथील फुडलँड कंपनीलगतच्या रेल्वे यार्डमध्ये जात होता. या वेळी यादव हा मुंब्रा-पनवेल मार्गावर फुडलँड कंपनीजवळून रेल्वे यार्डकडे जाण्यासाठी तेथील सिग्नलवर वळण घेत होता. याचवेळी रस्त्याच्या बाजूने चालत जाणारी ६५ वर्षीय अज्ञात व्यक्ती ट्रकच्या पाठीमागील चाकाखाली आली.

या अपघातात व्यक्तीच्या दोन्ही पायांना जबर दुखापत झाल्याने कळंबोली पोलिसांनी त्याला तत्काळ एमजीएम रुग्णालयामध्ये दाखल केले. तिथे उपचार सुरू असताना, त्याचा मृत्यू झाला. या अपघातातील १२ चाकी बल्कर ट्रकचालकाने काळजी न घेता, निष्काळजीपणे ट्रक चालवून नेल्याने रस्त्याने पायी चालत जाणारी अज्ञात व्यक्ती ट्रकच्या चाकाखाली आल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे तळोजा पोलिसांनी ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

दरम्यान, मुंब्रा-पनवेल मार्गावर अवजड वाहनचालक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवत असल्याने या मार्गावर दररोज अपघात होतात.

# हर घर नल, हर घर जल! भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कुडावेत पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असलेली जनजीवन मिशन अंतर्गत हर घर नल हर घर जल ही योजना देशभरात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत भाजपचे जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे पनवेल तालुक्यातील कुडावे गावात पाणीपुरवठा योजनेसाठी ६३ लाख ६५ हजार २३७ रुपये मंजूर झाले असून या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. १८) झाले.




भूमिपूजन समारंभास भाजप युवा मोर्चाचे पळस्पे विभागीय अध्यक्ष योगेश लहाने, कुडावे गाव अध्यक्ष विनायक पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष सुनील गवंडी, नांदगावचे माजी सरपंच अविनाश गायकर, सांगुर्ली ग्रामपंचायतीचे सदस्य शरद वांगिलकर, तुरमाळेचे उपसरपंच दत्तात्रेय हातमोडे, माजी सरपंच राम हातमोडे, पळस्पे ग्रामपंचायतीचे सदस्य अजय तेजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पोलिसांच्या समस्यांसाठी 'समाधान' हेल्पलाइन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदारांची जास्त वैद्यकीय बिले, वेतन निश्चिती, फ्रेज व पदोन्नती, पेन्शन इत्यादी कार्यालयीन समस्या तसेच इतर तक्रारींचे निवारण करण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून 'समाधान' हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे.



पोलीस अधिकारी व अंमलदारांना ९१३७२७९१०३ या हेल्पलाइनवर फोन अथवा व्हॉट्सअॅप मेसेजच्या माध्यमातून तक्रार दाखल करता येणार आहे. या हेल्पलाइनमुळे पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पोलीस आयुक्तालयातील खेटे बंद होऊन त्यांच्या वेळेची बचत होणार असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणून रुजू होताच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलीस दलातील प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील प्रशासकीय कामकाजाचा शीघ्रतेने निपटारा व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी ही हेल्पलाइन सुरू केली आहे.

## करंजाडेच्या सीमांकनाबाबत सोमवारी सुनावणी



**उरण : बातमीदार**

करंजाडे गावाच्या सीमांकनाबाबत दुसरी सुनावणी सोमवारी (दि. १६) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे ठेवलेली होती. या वेळी योग्य तो निर्णय न झाल्याने आता ही सुनावणी पुढच्या सोमवारी (दि. २३) जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे नियोजित केलेली आहे. त्यामुळे या सुनावणी वर सर्वांचे लक्ष लागुन आहे.

सीमांकन बाबत सिडकोला वेळोवेळी लेखी अभिप्राय देण्यासाठी माननीय मुंबई उच्च न्यायालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन मागणी केलेली आहे, पण सिडकोला जमीन मालकी सिद्ध करता येत नाही. त्यामुळे कोकण विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर यांनी सिडकोला करंजाडे ग्रामस्थांच्या सीमांकन मागणीबाबत स्पष्टीकरण मागितले. त्यावर भाष्य करणे सोडुन प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के भुखंड दिले तेच गावठाण विस्तार होते असा मुद्दा मांडला. जिल्हाधिकाऱ्यांनी सिडकोला १९७५ सालापासून आजपर्यंत गावठाणातील जमीन आरक्षित केली तेव्हा, संपादन केले तेव्हा आणि नगर नियोजन करून भुखंड पाडले तेव्हा गावठाणातील घरांच्या बाबत कोणती दखल अथवा नोंद घेतली याबद्दल लेखी अभिप्राय मागितला आहे. तसेच करंजाडे ग्रामस्थांमार्फत गावठाण विस्ताराची आजपर्यंत केलेल्या मागणी आणि पत्रव्यवहाराची मागणी केलेली आहे.

या वेळी करंजाडे ग्राम समिती मार्फत कर्णा शेलार, सरपंच मंगेश शेलार, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, कुणाल लोंढे आणि इतर ग्रामस्थांनी प्रयत्न केले. प्रकल्पग्रस्त नेते राजाराम पाटील यांनी सिडको प्रशासन जिल्हाधिकारी आणि मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश मानत नाही म्हणुन सिडकोचा जाहीर निषेध केलेला आहे.

प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा वाढीव मोबदला हाच गावठाण विस्तार असा संभ्रम निर्माण करणाऱ्या सिडकोने प्रथम त्यांचा लेखी अभिप्राय कोर्टाला द्यावा, असे प्रतिपादन गावठाण विकास सामाजिक संस्थेतर्फे किरण पाटील यांनी केले.







**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष तथा पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, निता माळी, रवी नाईक, के. जी. म्हात्रे, महिला मोर्च्याच्या शहर अध्यक्ष वर्षा नाईक, लिना पाटील, स्नेहल खरे, शिल्पा म्हात्रे, बिता मंजुळे, प्रतिभा भोईर, प्रणाली घरत आदी उपस्थित होते. सर्वांनी रत्नप्रभा घरत यांचे अभीष्टचिंतन केले.**

(छाया : योगेश पाटील, अक्षय शार्दुल)







## संपादकीय

# गुंतवणुकीचा धडाका

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दोन दिवसांकरिता दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेला गेले तेव्हा विरोधीपक्षांनी विनाकारण नाके मुरडली होती. महाराष्ट्रातील उद्योग अन्य राज्ये पळवून नेत असताना दावोसला जाऊन काय उजेड पाडणार असा नकारात्मक सूर विरोधकांनी लावला होता, परंतु एक लाख ३७ हजार कोटी रुपये किमतीचे सामंजस्य करार घडवून आणत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांची तोंडे बंद केली आहेत असेच आता म्हणावे लागेल.

**स्वित्झर्लंडमधील दावोस या टुमदार पर्यटनस्थळी दरवर्षी होणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राचा डंका वाजवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी परतले. जगभरातून अनेक अर्थतज्ज्ञ, धोरणकर्ते, नेते आणि उद्योजक प्रतिवर्षी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेसाठी एकवटतात. कोट्यवधी डॉलर्सचे जागतिक व्यवहार याच परिषदेत ठरतात. महाराष्ट्रातर्फे यशस्वी वाटाघाटी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वेळात वेळ काढून यावर्षी तेथे गेले. अर्थात त्यांच्यासोबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी आणि अन्य सरकारी अधिकारी होते. या परिषदेत जगभरातील विविध उद्योगसमूहांशी महाराष्ट्र सरकारने अनेक करार केले. या सामंजस्य करारांनुसार तब्बल एक लाख ३७ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक नजीकच्या भविष्यकाळात महाराष्ट्रात येऊ शकेल. मुख्यमंत्री शिंदे जेमतेम दोन दिवसच या परिषदेला उपस्थित राहिले, परंतु तेवढ्या अल्पावधीत त्यांनी सुमारे ८८ हजार कोटींच्या सामंजस्य करारांवर सह्या घडवून आणल्या. या खातर मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे. अर्थात दावोस येथे पार पडलेले करार हे समझोत्याच्या स्वरूपातील आहेत. त्याचे प्रत्यक्षात येणे हे पुढील परिस्थितीवर अवलंबून असते. हे सर्व करार निव्वळ कागदावर राहणार नाहीत, तर ते प्रत्यक्षात येऊन एक लाखापेक्षा जास्त प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार महाराष्ट्रात निर्माण होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे तर मुख्यमंत्र्यांनी नव्या वर्षाची सुरूवात जोरदार रीतीने केली असेच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे हे करार घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे फार कमी वेळ उपलब्ध होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मुंबई दौरा गुरुवारी पार पडत आहे. त्यांच्या स्वागतासाठी आणि भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दावोस दौरा रद्द करावा लागला. गेल्या वेळी मुख्यमंत्रीपदी असताना फडणवीस यांनी दावोस येथे जाऊन महाराष्ट्राची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे मांडली होती आणि मोठ्या मूल्यांचे उद्योग महाराष्ट्रात येतील याची पायाभरणी केली होती. त्याची मधुर फळे महाराष्ट्राला आता चाखता आली. गेल्या वर्षी याच परिषदेला तेव्हाचे उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी हजेरी लावली होती. त्यांनी तेथे नेमके काय केले हा अजुनही संशोधनाचा विषय आहे. यंदाच्या परिषदेतील एका नव्या करारानुसार अमेरिकेच्या न्यू एरा क्लीनटेक सोल्युशन्सचा चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे २० हजार कोटी रुपयांचा कोळशावर आधारित वायु प्रकल्प उभा राहणार आहे. त्याचप्रमाणे इंग्लंड, इस्रायल, पोर्तुगाल आणि जपान या देशांतील उद्योगांनी देखील महाराष्ट्र सरकारसोबत हजारो कोटींचे करार केले आहेत. सुपा औद्योगिक वसाहतीसंदर्भात जपान बँकेसमवेत मुख्यमंत्र्यांनी यशस्वी वाटाघाटी केल्याचे समजते. एकंदरीत मुख्यमंत्री शिंदे यांचा दावोस दौरा सफल झाला असेच म्हटले पाहिजे. महाराष्ट्राची घोडदौड शिंदे-फडणवीस सरकारच्या कारभारात अधिक वेगाने चालू राहील याचाच हा पुरावा मानायला हवा.**

# पोलादपुरात स्ट्रॉबेरी पिकाचे सातत्य टिकवण्याची गरज



**खबरबात**
**शैलेश पालकर**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सध्या पोलादपूरमध्ये महाबळेश्वरची रसरशीत स्ट्रॉबेरी विकण्यासाठी दरवर्षीप्रमाणे काही शेतकरी घेऊन येऊ लागले आहेत. काही वर्षांपूर्वी तालुक्यातील मोरगिरी येथे स्ट्रॉबेरीची शेती करण्याचा प्रयोग यशस्वी होऊनही त्यामध्ये सातत्य ठेवणे शेतकऱ्यांना शक्य न झाल्याने अजूनही या घाटावरच्या महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरीवरच पोलादपूरकरांना अवलंबून राहावे लागत आहे.

पोलादपूर तालुक्यात पावसाळयामध्ये अतिवृष्टी, हिवाळयात कडाक्याची थंडी आणि उन्हाळयामध्ये प्रचंड उष्णता असे तीनही ऋतू कमालीचे तीव्र स्वरूपात अनुभवावे लागत असतात. यामुळे प्रयोगशील शेतकऱ्यांना शेंगदाणा, हळद, बटाटे, कांदे अशी अपारंपरिक पिके घेण्यास संधी मिळते. मात्र, ही संधी यशस्वी करणारे शेतकरी या पिकांच्या उत्पादनामध्ये सातत्य ठेवत नसल्याचा अनुभव तालुक्यातील कृषी पर्यवेक्षकांना येत आहे. काही वर्षांपूर्वी मोरगिरी येथील एका प्रयोगशील शेतकऱ्याने दीड-दोन एकर शेतजमीनीवर स्ट्रॉबेरीची लागवड यशस्वी केली. मात्र, बाजारातील मागणी आणि महाबळेश्वर-पांचगणीच्या स्ट्रॉबेरी उत्पादनाशी स्पर्धा यामुळे त्या शेतकऱ्याला स्ट्रॉबेरी लागवडीचे सातत्य टिकविता आले नाही.

सध्या दरवर्षीप्रमाणे पोलादपूर एस.टी. स्थानक आणि पोलीस स्टेशनच्या परिसरातील मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गालगत रोज सकाळी महाबळेश्वर परिसरातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी रसरशीत लालचूटूक स्ट्रॉबेरी टोपल्यांमधून विकण्यासाठी घेऊन बसतात. सध्या प्रतिकिलो १०० रूपये दर आहे आणि तरीही स्ट्रॉबेरीचे फळ काहीसे आंबट असल्याने ग्राहकांकडून केवळ हौशीपोटी खरेदी केली जात आहे. शिमग्यापूर्वी या फळाची गोडी अवीट होऊन उत्पादन वाढल्याने दरही कमी होत असल्याने या शेतकऱ्यांना सध्या केवळ बाजारपेठ व मागणी टिकवून ठेवण्यासोबत रोज उपलब्ध होणारी स्ट्रॉबेरीची फळे नासून जाण्यापूर्वी विकून प्रवासभाडे व चरितार्थ चालविण्यापुरती कमाई करण्यासाठीच धडपड करावी लागत आहे. दिवसभर विक्रीसाठी बसणे शक्य नसलेल्या काही शेतकऱ्यांकडून कुंभळवणे येथील रवींद्र महाडीक यांनीही स्ट्रॉबेरी विकत घेऊन त्यांच्या पानाच्या टपरीसोबत स्ट्रॉबेरी विक्रीचा प्रयत्न चालविला आहे. सध्या मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर केवळ पोलादपूर येथेच अशी रसरशीत लालचूटूक स्ट्रॉबेरी विक्रीस उपलब्ध असल्याने कोकणात जाणारे चाकरमानी आवर्जून आपल्या गाडया येथे थांबवून स्ट्रॉबेरीचा आस्वाद घेत आहेत.

पुढील महिन्यापर्यंत ओठ जांभळे करणारा रानमेवादेखील दरवर्षीप्रमाणे विक्रीसाठी पोलादपूरला येणार असून येथून शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे तोंड रंगविणारा मेवा हे आवडते खाद्य असल्याची माहिती या वेळी रवींद्र महाडीक यांनी दिली. महाबळेश्वरची गाजर, पुदीना तसेच अन्य पिकेदेखील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चाकरमान्यांना पोलादपूर येथून खरेदी करण्याची आवड असल्याचे या वेळी ते म्हणाले. बाजारपेठेत स्ट्रॉबेरी, मेवा, गाजर व पुदीना या पिकांची मागणी असताना स्थानिक शेतकऱ्यांनी ही पिके घेतल्यास गुंतवणूक वसूल होऊन बऱ्यापैकी कमाईदेखील होऊ शकते, असे विश्वास स्थानिक विक्रेते महाडीक यांनी सांगितले.

मुंबईतील अनेक वर्षांच्या कापड व्यापाराला कायमचा रामराम करून पोलादपूर तालुक्यातील गावाकडे आलेले रामचंद्र दाजी कदम ऊर्फ कदमशेठ यांनी सातत्याने शेती व्यवसायातील वैविध्यपुर्ण प्रयोग करून मुंबईस्थित चाकरमान्यांना आईवडीलांच्या सेवेसह काळयाआईची म्हणजेच जमिनीची सेवा करण्यासाठी आकर्षित केले. कदमशेठ यांना त्यांच्या शेतातील स्ट्रॉबेरीची अवीट चव आणि माणिक रत्नासारखं आकर्षक रूप पाहून पेरूच्या पिकाला पुरामुळे झालेले नुकसान भरून येण्याची आशा वाटत असताना एकूणच पिक काढून झाल्यानंतर फक्त स्ट्रॉबेरीचे पिकच ना नफा ना तोटा ठरल्याचे जाणवल्याने त्यांनी पुन्हा स्ट्रॉबेरीची शेती केली नाही.कोकणामध्ये रायगड जिल्ह्याच्या पोलादपूर तालुक्यातील चाळीचा कोंड रस्त्याच्या बाजूला बोरज गावाच्या हद्दीत प्रयोगशील शेतकरी रामचंद्र कदम यांच्या पेरूच्या शेतात जुलैमधील अतिवृष्टीमुळे ढवळी, कामथी आणि सावित्री नद्यांच्या त्रिवेणी संगमावरील पुराचे पाणी मोठया प्रवाहाने शिरले आणि बहुतांशी पेरूची झाडे वाहून गेली. पेरूच्या शेतीला बसलेल्या या पुराच्या फटक्यातून सावरण्यासाठी प्रयोगशील शेतकरी रामचंद्र कदम यांनी चक्क महाबळेश्वर येथून स्ट्रॉबेरीची रोपं आणून शेती करण्याचा निर्णय घेतला. कोकणातील हवामानात स्ट्रॉबेरीची शेती यशस्वी होत नसल्याचा अनुभव असताना शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या कदमशेठ यांचे धाडस अनेकांना आश्चर्यचकित करणारे होते. त्यांनी महाबळेश्वर येथून स्ट्रॉबेरीची रोपं आणून बोरज गावातील त्यांच्या शेतात पिक घेण्याचे ठरविले. एन्टर आणि नॉबिली अशा दोन जातीच्या स्ट्रॉबेरीची रोपं चांगले उत्पादन देतात अशी माहिती मिळाल्याने त्यांनी दोन्ही जातीची प्रत्येकी पाच हजार रोपं खरेदी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, सातारा जिल्ह्यातील वाई, पाचगणी, महाबळेश्वर भागातही यंदा पावसाने जोर धरल्याने रोपांचे भावही वाढले होते. तरीही वाढीव भाव देऊन कदमशेठ यांनी रोपं खरेदी करून गावाकडील शेतात आणली आणि लागवड केली. यावेळी अनेक रोपं मेली मोडली तरीही नुकसान होवो अथवा फायदा पण समाधान मिळाले पाहिजे तर मेहनत आणि चिकाटी बाळगलीच पाहिजे, या निर्धाराने त्यांनी उत्तम मशागत करून पावसापासून आणि उन्हापासून रोपं वाचवित तसेच हवेतील गारवा टिकवित पिकाची जोपासना केली.रामचंद्र कदम यांनी स्ट्रॉबेरीची लागवड केलेल्या जमिनीतील पाण्याचे प्रमाण नियंत्रित राहण्यासाठी स्ट्रॉबेरीच्या रोपांच्या दोन्ही बाजूंनी लसूणही लावली. या सर्व पिकाची देखभाल करण्यासाठी रामचंद्र कदम सकाळी सात वाजल्यापासून सायंकाळी सात वाजेपर्यंत शेतावरच तळ ठोकून राहिले. रोपांना फळं लागली पण हिरवी, पांढरी आणि काहीशी निस्तेज गुलाबी हे पाहून बुचकळयात पडलेल्या प्रयोगशील शेतकरी कदमशेठ यांना वाईतील एका अनुभवी शेतकऱ्यांने मार्गदर्शन करण्यास सुरूवात केली आणि त्यानुसार रोपांची काळजी घेतल्यानंतर त्याच फळांनी केवळ तीन महिन्यातच लालचुटूक माणिक रत्नासारखं रूपडं धारण केले. सर्व रोपांना स्ट्रॉबेरी लागलीच पण या स्ट्रॉंबेरीची आंबटगोड चवही अवीट असल्याचे अनेकांचे म्हणणे झाले आहे.

आंबा, पेरू, झेंडू, वांगी, पपई, केळी, गहू अशी अनेक पिके घेऊन आता स्ट्रॉबेरीचा प्रयोग रामचंद्र कदम करीत असल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील निकम, मनोज जाधव तसेच सर्वच कृषी विभागाचे पर्यवेक्षक आणि सहायक या स्ट्रॉबेरी शेतीची पाहणी करून कदमशेठ यांना मार्गदर्शन करू लागले. आता रामचंद्र कदम यांना त्यांचे स्ट्रॉबेरीचे पिक चांगला भाव मिळून यंदाचे नुकसान कमी करून फायदा पदरी पडेल असा विश्वास वाटत अयताना ही शेती फक्त ण्का हंगामापुरतीच यशस्वी ठरली.

**नियोजित स्ट्रॉबेरी फार्मबाबत सावळागोंधळ**

पोलादपूर तालुक्यातील महाड एमआयडीसीच्या संपादीत जमिनीवर संपादित असल्याचा शिक्का नसल्याने काही शेतकऱ्यांनी या जमिनी विकल्या असून या जमिनीपासून काही अंतरावर महाड औद्योगिक वसाहतीचे रानबाजिरे धरण आहे. स्ट्रॉबेरी सिटी या नियोजित स्ट्रॉबेरी फार्मबाबत एक प्रशासकीय भ्रष्टाचाराची कहाणी उघडकीस आणणाऱ्यालाच याचा त्रास झाला आणि स्ट्रॉबेरी सिटी हा नियोजित स्ट्रॉबेरी फार्म आजतागायत पुढे सरकला नाही.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल मीटच्या मिटींगमध्ये नवीन फिचरची कमाल



जगभरात कोरोनाचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे बर्याच आपल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा ऑफिसमध्ये बोलवत आहेत. तर काहींचे अजून घरूनच काम सुरू आहे. असे असले तरी ऑफिसच्या मिटींग्स या कुणालाच चुकलेल्या नाहीत. कोरोना काळात ऑफिसच्या मिटिंग्स झूम, गुगल मिट वर होत होत्या. त्यासाठी आता गुगलने गुगल मीटवर एक प्रमुख अपडेट दिले आहे, ज्याचा उद्देश ऑफिसला जाणाऱ्यांना त्यांचे दैनंदिन कामात मदत करणे आणि कामाचे व्यवस्थापन सोपे करणे आहे.

या अपडेटचा एक भाग म्हणून, गुगल मीट इन-मीटिंग रिएक्शन हा पर्याय आणते आहे. मीटिंगमध्ये गुगल मीट वापरकर्त्यांना प्रतिसाद देण्यासाठी किंवा इतर सहभागींना त्यांच्या कमेंट्स देण्याचा मार्ग म्हणून थंब्स अप, हार्ट, मोठ्याने हसणे, थंब्स डाउन, सरप्राईज आणि टाळ्या असे निवडक इमोजी वापरण्यासाठी मिळणार आहेत. कंपनीने गुगल मीटवर कमेंटसाठी स्क्रीनशॉट शेअर केला आहे. त्यानुसार युझर्स सेटिंग्ज मेनू वापरून हे इमोजी बदलू शकतात, जे या इमोजींच्या पुढे दिसतील, जेव्हा युझर्स मीटिंगमध्ये असतील तेव्हा स्क्रीन शेअरिंग बटण त्याच्या शेजारी दिसणार आहे. त्यासाठी घड्याळाच्या आयकॉनवर क्लिक करायचे आहे. कंपनीच्या मते, लोकांच्या प्रतिक्रिया व्हिडिओ टाइलमध्ये दिसतील किंवा त्यांची व्हिडिओ टाइल दिसत नसल्यास त्यांच्या नावाने ओव्हरफ्लो होईल आणि त्या लवकरच वापरासाठी उपलब्ध होतील.

**पिक्चर-इन-पिक्चर मोड (पीआयपी मोड)**

गुगल मीटमध्ये गुगल पिक्चर-इन-पिक्चर मोड (पीआयपी मोड) हा नवीन पर्याय देणार आहे. एका ब्लॉग पोस्टमध्ये, गुगलने क्रोम ब्राउझरवर मीटमध्ये पिक्चर-इन-पिक्चर आणत असल्याचे सांगितले. प्रेझेंटर्स आणि मल्टीटास्कर्सना वेगवेगळ्या टॅब आणि विंडोमधून नेव्हिगेट करताना हे पाहण्यास मदत मिळणार आहे.

# प्रसिद्ध विनोदी लेखक चिंतामण जोशी



**निमित्त**

प्रसिध्द मराठी विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी यांचा जन्म १९ जानेवारी १८९२ रोजी पुणे येथे झाला. 'सुधारक' या पत्राचे संपादक वि. रा. जोशी हे त्यांचे वडील होते. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात झाले. फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. (१९१३), एम.ए. (१९१६) झाले. त्यांनी चाळीसपेक्षा अधिक पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्त्वाची होय. पाली भाषेचा त्यांचा विशेष अभ्यास होता. बडोदे महाविद्यालयात ते पाली विषयाचे प्राध्यापक होते.

त्यांचे वडील विनायक रामचंद्र जोशी हे शिक्षक होते. त्यांनी आगरकर यांच्या सुधारक या वृत्तपत्राचे काही काळ संपादनही केले होते. सार्वजनिक काका म्हणून ओळखले जाणारे गणेश वासुदेव जोशी हे देखील जोश्यांच्याच घराण्यातले होते. चिं. वि. जोशी यांचे बहुतांशी लेखन हे विनोदी वाङ्मय असले तरी ते व्यावहारिक जीवनात ते धीरगंभीर प्रवृत्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या मुलाचा अकाली मृत्यू झाला होता, त्यामुळे ते दुःखी असत.


दूरचित्रवाणीवरची 'चिमणराव-गुंड्याभाऊ' ही मालिका खूप गाजली. मालिकेत चिमणरावांचे काम दिलीप प्रभावळकरांनी, गुंड्याभाऊचे बाळ कर्वे यांनी, चिमणरावांच्या पत्नीचे (कावेरीचे-काऊचे) स्मिता पावसकर यांनी, मैना या कन्येचे काम अरुणा पुरोहित यांनी तर मोरू व राघू या पुत्रांचे काम अनुक्रमे नीरज माईणकर व गणेश मतकरी यांनी केले होते. सुषमा तेंडुलकर, लक्ष्मीकांत बेर्डे, सुलभा कोरान्ने या व इतर बऱ्याच कलाकारांनी देखील या मालिकेत काम केले होते. या मालिकेच्या निर्मात्या विजया जोगळेकर-धुमाळे होत्या.

चिं.वि. जोशी यांच्या कथेवर सन १९४२ मध्ये 'सरकारी पाहुणे' नावाचा चित्रपट निघाला होता. त्याचे दिग्दर्शन मास्टर विनायक यांनी केले होते. चिमणरावांची भूमिका दामुअण्णा मालवणकर यांनी केली होती. चिं.वि. जोशींच्या, संध्या बोडस-काणे व अलका जोशी-मांडके या नातींनी संकलित केलेले 'चि.वि. जोशी - साहित्यातले आणि आठवणीतले' हे पुस्तक कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने छापून प्रसिद्ध केले आहे. अक्षरधारा प्रकाशनाने 'विनोदाचे बादशहा चिं. वि जोशींचे निवडक विनोद' नावाचे एक अतिशय छोटे पुस्तक प्रकाशित केले आहे. विनोदांचे संकलन रवींद्र कोल्हे यांनी केले आहे. विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर-गडक-यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या 'एरंडाचे गु-हाळ (१९३२)'मधील लेखन व 'चिमणरावांचे च-हाट (१९३३)', मधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो. या मराठी लेखकांबरोबरच मार्क ट्वेन, डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्स, जेरोम के जेरोम, हर्बर्ट जेकिन्स, स्टीफन लीकॉक यांच्या विनोदी लेखनाचे संस्कार त्यांच्यावर झाले.

पूर्वीच्या विनोदकरांप्रमाणे त्यांनीही चिमणराव व गुंडयाभाऊ अशी मानसपुत्रांची जोडगोळी जन्मास घातली आणि तिला विविध लोकव्यवहारांतून फिरवून आणले. पण त्यांच्या चित्रणात अतिशयोक्तीपेक्षा स्वभावोक्तीवर आणि समाजसुधारणेच्या मंडनापेक्षा मानवी स्वभावातील साध्यासुध्या विसंगतींच्या दर्शनावर भर राहिला. त्यांची निवेदनशैलीही मर्मभेदक कोटित्वापेक्षा मार्मिक व स्वभाविक संवादानी नटलेली आहे. त्यामुळ त्यांचे लेखन निबंधरूप होण्या ऐवजी त्याला ललित कथेचा घाट प्राप्त झाला व त्यातून मध्यमवर्गीयांचे एक अस्सल व स्वयंपूर्ण विश्व साकार झाले. वर उल्लेखिलेल्या पुस्तकांशिवाय वायफळाचा मळा' (१९३६), आणखी चिमणराव (१९४४), ओसारवाडीचे देव (१९४६), गुंडयाभाऊ (१९४७), रहाटगाडगं (१९५५), हास्यचिंतामणी (१९६१), बोरीबाभळी (१९६२), हे त्यांचे विनोदी लेखसंग्रह प्रसिध्द आहेत. 'चिमराव स्टेट गेस्ट' ह्या त्यांच्या एका कथेवरुन काढण्यात आलेला 'सरकारी पाहुण' हा चित्रपट महाराष्ट्रात विलक्षण गाजला होता.

**(साभार : मराठी वर्ल्ड आणि विकीपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : शहराच्या समुद्र किनाऱ्यापासून तीन किलोमीटर अंतरावर ऐतिहासिक पद्मदुर्ग असून जेट्टी उपलब्ध नसल्याने पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांना तेथे जाता येत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला हा किल्ला पाहता यावा यासाठी जेट्टी बांधून मिळावी अशी मागणी शिवप्रेमी व पर्यटकांकडून होत आहे.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# थायरॉईडमुळे शरीरावर होतो 'असा' परिणाम

शरीरात थायरॉईडचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी झाले तर त्या व्यक्तीला सतत चिंता वाटत राहते. सतत चिडचिड होते, राग येतो. कोणत्याही कामात लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते.



रुग्ण नेहमी उदास आणि दुःखी राहतो. लोकांना भेटणे किंवा बोलणे यातही अडचण येते. रोजच्य कामांमध्ये मन लागत नाही. दिवसभर आळस येतो, तसेच थकवा येणे, थंडी वाजणे, काही प्रकरणांमध्ये वजन वाढणे, अशी लक्षणेही दिसून येतात. तसेच काही रुग्णांचा आवाज जड होतो, तर काहींना बद्धकोष्ठतेचा त्रास होतो. तसेच स्नायू अशक्त होणे, चेहरा सुजणे असाही त्रास होतो. महिलांना मासिक पाळीदरम्यान खूप त्रास होतो तसेच केसही पातळ होतात.

**थायरॉईडपासून वाचण्यासाठी घरगुती उपाय**

**आयोडीनयुक्त मीठ-** हेल्थलाइननुसार, थायरॉईड कमी असल्यास आयोडीनयुक्त मीठाचा वापर करू नये. याशिवाय सीफूड, दुग्धजन्य पदार्थ, अंडी, चिकन यासारखे पदार्थ खाणेही टाळावे.

**बग्लीवीड वनस्पती-** हृदय आणि फुफ्फुसाच्या समस्यांवर बग्लीवीड वनस्पतीने उपचार केले जातात. बग्लीवीड ही लॅव्हेंडरसारखीच एक वनस्पती आहे ज्याची फुले औषधी कामांसाठी वापरली जातात. याद्वारे थायरॉईड देखील नियंत्रित करता येते.

**लेमन बाम -** लेमन बाम हीदेखील एक वनस्पती आहे जी थायरॉईडवर उपचार करण्यासाठी वापरली जाते. ही पुदिन्यासारखीच असून सहज उपलब्ध होते.

**लव्हेंडर ऑइल-** थायरॉइडच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी लव्हेंडर ऑईलने मसाज करणे फायदेशीर ठरते. यासोबतच चंदनाचे इसेंशिअल ऑईलचा वापर केल्यानेही थायरॉईडमुळे उद्भवणाऱ्या मानसिक समस्यांपासूनही संरक्षण होऊ शकते.

**व्यायाम-** ज्याप्रमाणे इतर अनेक आजारांमध्ये व्यायामाचा खूप फायदा होतो, त्याचप्रमाणे थायरॉईडच्या समस्येवरही व्यायाम फायदेशीर ठरतो. थायरॉईडमधील मानसिक समस्या टाळण्यासाठी योगासने व इतर व्यायामसोबतच मेडिटेशन करणे देखील फायदेशीर ठरते.

**(संबंधित विकारांची प्राथमिक माहिती, लक्षणे, तसेच काय करता येईल, याची माहिती देण्याचा आमचा हा प्रयत्न आहे, पण कोणताही उपचार करण्याआधी संबंधित आजारातील, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या.)**

# सफाई कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## माणगाव उपजिल्हा रुग्णालयात वेतन न दिल्याने कुटुंबांवर उपासमारीची वेळ

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून माणगांव शहरात उपजिल्हा रुग्णालय आहे. हे रुग्णालय शंभर खाटांचे असून दक्षिण रायगडमधील हजारो नागरिक या रुग्णालयात उपचारासाठी येत असतात. या रुग्णालयात सफाई, धुलाई, आहार अशा अनेक सेवा ठेकेदारामार्फत पुरविल्या जातात. या रुग्णालयात कंत्राटी स्वरूपात काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना गेल्या ३ ते ४ महिन्याचे वेतन न मिळाल्याने त्यांनी १८ जानेवारीपासून काम बंद आंदोलन केले आहे.



अनेक वर्षांपासून उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे हे कर्मचारी कंत्राटी स्वरूपात साफ सफाई विभागात काम करीत आहेत. दोन वर्षांपासून ज्वाला नामक कंत्राटी कंपनी हे कंत्राट बघत आहे. आधी या साफ सफाई विभागात ११ कर्मचारी करीत होते. परंतु नवीन आलेल्या कंत्राटी कंपनीने काही कारण नसताना ४ कामगारांना कामावरुन काढून टाकले असून ७ कर्मचारी आता काम करीत आहेत. कोरोना काळात सुद्धा या कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता सेवा दिली आहे. या कर्मचाऱ्यांपैकी काही जणांचे ३ महिन्यांचे तर काही जणांचे ४ महिन्यांचे वेतन ठेकेदाराने दिलेच नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. उपजिल्हा रुग्णालयातील सफाई कर्मचारी वेतन न दिल्याने १८ जानेवारीपासून काम बंद केले असून तशा प्रकारचे निवेदन उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, नगर पंचायत माणगांव नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, प्रांताधिकारी माणगांव उमेश बिरारी, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने यांना दिले आहे.

उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे या आधी जिल्ह्यातील स्थानिक कंत्राटदार निवडून त्यांना ठेका दिला जात होता. त्यावेळी अशी परिस्थिती कधी ही उदभवली नाही. मात्र जिल्ह्याबाहेरील कंत्राटदार आल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली असून अल्पशा वेतनात त्यांना राबवून घेतले जात आहे. तसेच त्यांनी आपल्या वेतनाची मागणी केली असता कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते. या कर्मचाऱ्यांना कोणतीही सुरक्षा, आरोग्य विमा, इतर सुविधा दिल्या जात नाहीत. त्यांना साफ सफाई करण्यासाठी अपुरे साधने पुरविली जातात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना काम करण्यास अनेक अडथळे येत असतात अशी माहिती कर्मचाऱ्यांनी बोलताना दिली.

उपजिल्हा रुग्णालयात रोज हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. त्यातील काही रुग्ण प्रसूती, शस्त्रक्रिया किंवा इतर वैद्यकीय सेवा घेण्यासाठी रुग्णालयात ऍडमिट होत असतात. रुग्णालयातील सफाई कामगार यांनी एक दिवस काम बंद केल्याने साफ सफाई नसल्यामुळे रुपलगणालयात दुर्गंधी पसरलेली दिसत होती. रुग्णांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. तसेच आहार व धोबी विभागातील ठेका हा पालघर येथील चांदणे नावाचा कांत्राटदार हा असून त्यांनी सब ठेकेदार बैलमारे याला देले असून या सब ठेकेदार यांनी तर आहार विभागातील २ सेविकांना कामावरून काही कारण नसताना कडून टाकले आहे. व धोबी विभगातील पुरारकर यांना दर महा ६००० वेतन ठरवले होते मात्र सप्टेंबर २०१९ पासून त्यांना आज तगायात फक्त पंधरा हजार रुपये देण्यात आले असून उर्वरित पैसे मगीले अस्त उडवाउडवीची उत्तरे देत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन कर्मचाऱ्यांना न्याय देऊन रुग्णांची हेळसांड होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ..तर कंत्राटदाराचा ठेका रद्द करा!

**या निवेदनाची दखल घेत माणगावचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार समवेत उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरसेवक कपिल गायकवाड, स्वच्छता सभापती अजित तार्लेकर, नगसेवक दिनेश रातवडकर, पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता यांनी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे येऊन प्रभारी वैद्यकीय अधीक्षक गोमसाळे यांना भेटून संबधित कंत्राटदार यांना संपर्क साधून ज्या कर्मचारी यांना कामावरून काढण्यात आले आहे. त्यांना कामावर घेण्यात यावी तसेच संबधित मूळ ठेकेदार यांना कर्मचारी वर्गाचे वेतेन देता येत नसेल तर या कांत्राटदार यांचा ठेका रद्द करा आम्ही येथील स्थानिक ठेकेदार देऊ असे सांगितले.**

### आरोग्य विभागाचे दुर्लक्ष का?

***उपजिल्हा रुग्णालयात ही वेळोवेळी परस्थिती उद्‌भवत असेल तर आरोग्य विभागांनी याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे अन्यथा एखाद्या कर्मचाऱ्याचे जीव गेल्यावर आरोग्य विभागाला जाग येणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. जर का अशी कर्माच्यांच्या बाबतीत संबधित कंत्राटदार वेळोवेळी हेळसांड करीत असेल तर या ठेकेदाराचा ठेका रद्द करून सक्षम ठेकेदार नियुक्त करावा. मात्र अश्या परिस्थितीतकडे उपजिल्हा रुग्णालय व आरोग्य विभाग का दुर्लक्ष करीत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.***

## उंबर्डेत वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई – गोवा महामार्गावर उंबर्डे गावच्या हद्दीत पायी जाणाऱ्या पादचाऱ्याला भरधाव मोटारीने धडक दिल्याने या अपघातात पादचारी गंभीर जखमी झाला होता. गंभीर जखमीचा रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला.

फिर्यादी अंकुश बाळाजी लांगी (४७) रा, रोडे, कांदळेपाडा ता.पेण यांचे वडील बाळाजी पोशा लांगी (वय ६५) हे मंगळवार १७ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास उंबर्डे येथे त्यांच्या नात्यातील व्यक्ती मयत झाल्याने त्याचे अंत्यविधीकरिता पायी चालत मुंबई गोवा महामार्गावरील गोवा लेनवरील रस्ता ओलांडताना गोवा बाजुकडे जाणारी सफेद रंगाची फोर्ट कंपनीची इंडोवर गाडी नं. एमएच ०२ सी.बी ६२७९ या गाडीवरील आरोपी चालकाने गाडी अतिवेगाने चालवून बाळाजी लांगी यांना जोरदार धडक दिल्याने त्यांच्या डोक्यास व पोटाला, पायाला लहान मोठया स्वरूपाच्या दुखापती झाल्या. यावेळी म्हात्रे हॉस्पिटल येथे उपचार घेत असताना त्यांचा मृत्यू झाला आहे. पेण पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्रांना बेबी वॉर्मर संच भेट



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील लोहोप आणि खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात बेबी वॉर्मर संच रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आर आय डिस्ट्रिक्ट ३१३१ यांच्या सहकार्याने द रोटरी फाउंडेशनच्या ग्लोबल ग्रँड योजनेअंतर्गत खालापूर तालुक्यातील लोहोप आणि खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती कक्षासाठी मुदतीपूर्वी प्रसूत झालेल्या बालकांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्यांचे मृत्यू होऊ नये यासाठी प्रत्येकी बेबी वॉर्मरचा संच बॅटरी बॅकअपसह प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटरीयन अमित शहा, आणि सदस्य उपस्थित होते. या प्रसंगी बहुसंख्य महिला रोटरीयन व ॲनेस उपस्थित होत्या. त्यांच्याहस्ते दोन्ही ठिकाणी बेबी वॉर्मरचे लोकार्पण करण्यात आले. लोहोपचे मुख्य आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे, आणि डॉ. सीमा आणि त्यांचे सहकारी लोहोप येथे उपस्थित होते. तर खालापूर येथे खालापुरचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. अनिलकुमार शहा आणि डॉ. रेश्मा नागरगोजे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणाऱ्या या उपकरणांचा उपयोग करून बाल मृत्युचे प्रमाण कमी करण्याचा आम्ही प्रयत्न करू असे दोनही केंद्रातील डॉक्टरांनी सांगितले. महत्वाचे असे प्राथमिक केंद्राला आवश्यक असणारे साधन मिळाल्याबद्दल आभार मानले.

## साजगाव येथे तरुणाची आत्महत्या

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली पोलीस स्टेशन हद्दीत साजगाव येथे प्रकाश शरद भालेराव वय ३२ या विवाहित युवकाने गळफास लावून आत्महत्या केली. बुधवारी सकाळी साडे दहा वाजण्याच्या सुमारास सदर प्रकार समोर आला असून, या संदर्भात पुढील तपास सुरू आहे.

खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडल्याने पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश काळसेकर हे पुढील पुढील तपास करत आहेत.

प्रकाश शरद भालेराव हा युवक पेंटिंग काम करत होता आणि तो मूळ राहणार नडोदे खालापूर येथील आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजले नाही पोलीस पुढील तपास करीत आहे. रायगड जिल्ह्यासह तालुक्यातील ग्रामीण भागात तरुण तरुणींच्या आत्महत्येचे प्रकार वाढत आहेत.हे रोखण्याची गरज आहे.

## लेखनकौशल्य आत्मसात करा –वैभव चाळके

**खोपोली : प्रतिनिधी**

मानवी जीवनात आपल्याला प्रत्येक टप्प्यावर अनेक अनुभव येतात. हे अनुभव नेमकेपणाने पकडता आले. अनुभवलेले शब्दबद्ध करून त्याला कारागिरीची जोड देता आली तर आपणाला उत्तम लेखन कौशल्य आत्मसात करता येईल. अनुभव संपन्नता, सजगता, भाषाकौशल्य, व्यक्त होण्याची इच्छा यातून उद्याचे चांगले लेखक– कवी घडावेत, असे मार्गदर्शन मुंबई कवी व भाषा अभ्यासक वैभव चाळके यांनी केले. के.एम. सी.महाविद्यालयाचा 'मराठी भाषा व साहित्य विभाग' आणि अंतर्गत गुणवत्ता निर्धारण समिती (आय.क्यू.ए.सी.) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या उपक्रमांतर्गत 'लेखन कौशल्य कार्यशाळा' या उपक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ.प्रताप पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.महाराष्ट्र शासन– मराठी भाषा विभागातर्फे प्रतिवर्षी दि.१४ ते २८ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' आयोजित केला जातो. या उपक्रमाचे औचित्य साधून मराठी विभागाने चर्चासत्र, लेखन कौशल्य कार्यशाळा, कवी संमेलन, मार्गदर्शनपर व्याख्याने, मुलाखत, निबंध व हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. ग्रंथभेट देऊन प्राचार्य डॉ.प्रताप पाटील यांनी वैभव चाळके यांचे स्वागत केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. मोहन बल्लाळ, जिमखाना चेअरमन प्रा. जी.पी. मुळीक, डॉ.अमोल नागरगोजे, प्रा.सुनील वाघमारे, प्रा.विठ्ठल जाधव यांच्यासह प्राध्यापक – प्राध्यापिका व विद्यार्थी – विद्यार्थिनी उपस्थित होते. कु.गौरी वाणी या विद्यार्थिनीने पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ.भाऊसाहेब नन्नवरे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. ऋतिक गवळे या विद्यार्थ्याने आभार मानले.



### विचारवंत होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा

***अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रताप पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयीन शिक्षणाचा काळ हा आपल्या जडणघडणीचा काळ आहे. विविध प्रकारची कौशल्य आत्मसात करण्याची संधी म्हणून पदवी शिक्षणाकडे पहा. खूप काही अनुभव येथे घेता येईल. बरच काही शिकता येईल. त्याचा लाभ घेऊन संपन्न आणि सुदृढ व्यक्तिमत्व तुम्हा विद्यार्थी –विद्यार्थिनींनी घडवायचे आहे. नव्या काळात अनेक संधी तुम्हाला खुणावत असून त्यासाठी उत्तम श्रोता, वाचक, लेखक, संवादक, विचारवंत होण्यासाठी सतत प्रयत्नांची पराकाष्टा करा, असे विचार प्राचार्य डॉ.पाटील यांनी व्यक्त केले.***

## कर्जत–किरवली येथे वाचक कट्ट्याचे उद्‌घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

किरवली येथे स्थनिक रहिवाशी ॲड. गौतम गायकवाड यांचे वडील आणि समता सैनिक दल कॅप्टन राहिलेले विठ्ठल वामन गायकवाड यांच्या समरणार्थ वाचक कट्टा बांधून दिला आहे. वाचक कट्ट्याचे उदघाटन कर्जत नगरपरिषदेचे नगरसेवक राहुल डाळीबंकर, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कर्जत शाखेचे अध्यक्ष गोपाळ शेळके यांच्या हस्ते करण्यात आले होते.

गोपाल शेळके यांनी या कट्याचे वाचकासाठी उपयोग करून घेण्याची काळाची गरज आहे म्हणून या कट्याचे वाचनासाठी ज्येष्ठ नागरिक नवीन पिढीसाठी चांगलाच उपयोगी ठरणार आहे. कट्ट्याच्या उद्घाटन प्रसंगी किरवली ग्रामपंचायत सरपंच संतोष सांबरी, सदस्य बिपिन बडेकर, ॲड. संतोष जोहेकर, पाटील विवेक बडेकर, सतिश देशपांडे, भारतीय बौद्ध महासभेचे उल्हास जाधव, आरपीआयचे सुनील सोनवणे, संतोष जाधव, गावातील ज्येष्ठ नागरिक युवा पिढी यांनी मोठी गर्दी केली होती.



महावितरण

**निविदा सुचना**

अलिबाग विभागाअंतर्गत विविध अवजड कामांकरिता हायड्रा क्रेन सेवा भाडेतत्वावर उपलब्ध करण्याच्या कराराकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई–निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे:

| निविदा क्रमांक | विभाग |
|---|---|
| हायड्रा क्रेन/काअ/अलिबाग/टि–०४/०१–२०२३ | अलिबाग |

अंदाज पत्रकीय रक्कम :– प्रत्येकी ०५.०० लाख

निविदा भरण्याची अंतिम दिनांक :– ३१/०१/२०२३

**अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.**

https://etender.mahadiscom.in/eatApp/

**कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**

## दिविल येथे भरदिवसा वणवा भडकला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दिविल गावाच्या डोंगरापासून गावाच्या खलाटीपर्यंतच्या रानात बुधवारी दुपारी वणवा भडकून आल्याने शेतकरी आणि गुराख्यांच्या डोळयांदेखत गाईगुरांचा उन्हाळ्यापर्यंतचा चारा जळून खाक झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात वणव्यांचे प्रमाण अधिक असून यापैकी असंख्य वणवे तरवे जाळताना लागतात तर काही नैसर्गिकरित्या वाळलेल्या गवतावर गवत घासून गवत पेट घेत असल्यामुळे लागत असल्याचे निष्पन्न झाले आहे. फारच क्वचित प्रमाणात हेतुपुरस्सररित्या वणवा लावून शेतकऱ्यांचे नुकसान करण्याच्या प्रयत्नांतून वणवे लागत असल्याचेही दिसून आले आहे. गेल्यावर्षी पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील मोटारसायकलस्वार जाणूनबुजून वणवे लावून वणवे शांत झाल्यानंतर अर्धवट जळलेल्या झाडांची जळाऊ लाकडं कालांतराने गोळा करीत असल्याचे काहींच्या निदर्शनास आले होते.

दिविल गावात बुधवारी भरदुपारी वणवा भडकला आणि पसरत गावालगतच्या शेतजमिनीपर्यंत पोहोचल्याचे जाणवताच अनेक शेतकरी कुटूंब आणि गुराख्यांनी हिरव्या पानांच्या झाडूने आग झोडपून वणवे शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याठिकाणी बादली आणि भांडयांतून पाणी आणताना पाण्याचा मारा कमी झाल्याने वणवा पूर्ण पेटून शांत झाला. यामुळे मोठया प्रमाणात गाई गुरांचा चारा जळून खाक झाला आणि येत्या मे महिन्यापर्यंत दिविल गावात चाराटंचाई निर्माण होण्याची परिस्थिती दिसत आहे.

MAHAVITARAN

**Invitation for bids on E-Tendering basis**

Tenders in e-tendering format are invited vide Tender No: SE/Pen/HR/T-24/T-25/T-26/2022-23.

Brief scope of works for the Contract is as below:

T-24: Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Roha division under Pen circle.

T-25: Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Goregaon division under Pen circle.

T-26: Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Panvel-rural division under Pen circle.

| Tender No. | Tender Fee | Tender Amount |
|---|---|---|
| T-24 | Rs.5000+ (GST18%) | 75 Lakh |
| T-25 | Rs.5000+ (GST18%) | 80 Lakh |
| T-26 | Rs.5000+ (GST18%) | 45 Lakh |

- Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 19/01/2023
- Last Date & time (Hours) for submission of bid: 25/01/2023 up to 14:00 Hrs online.

**For details visit website http://etender.mahadiscom.in/eTender/eatApp**

**Superintending Engineer**
MSEDCL, O&M circle, Pen

**PRO No.157/2022-23**

**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग**
**मुख्य कार्यालय :– आदर्श भवन, श्रीबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.**

**–: विशेष साधारण सभेची सूचना :–**

**(फक्त सभासदांसाठी)**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ०४ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ठिक ४.०० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय, ''आदर्श भवन'', श्रीबाग नं. ३, ता.अलिबाग, जि. रायगड येथील तीसऱ्या मजल्यावरील सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. अभिजीत सुरेश पाटील यांचे अध्यक्षते खाली खालील विषयावर कामकाज करण्यासाठी आयोजीत केली आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**–: सभेपुढील विषय :–**

विषय क्र. १ :– उरण शाखेसाठी उरण शहरात संस्थेच्या नावाने व्यापारी सदनिका खरेदी करणे करीता मंजूरी घेणे बाबत.

विषय क्र. २ :– नागोठणे शाखेसाठी नागोठणे शहरात संस्थेच्या नावाने व्यापारी सदनिका खरेदी करणे करीता मंजूरी घेणे बाबत.

दि. १९.०१.२०२३

**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**मिनाक्षी शामसुंदर पाटील**
**कार्यलक्षी संचालिका,**

**विशेष सूचना :–** वरील सभेस सायंकाळी ठिक ४.०० वाजता आवश्यक ती गणसंख्या पूर्ण झाली नाही तर ही सभा तहकूब केली जाईल, सदर तहकूब सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठिक ४.३० वाजता सुरु होईल, त्यावेळी गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

# स्वच्छता अभियानात नागरिकांचाही सहभाग

## नेरूळमध्ये रहिवाशांनी केली परिसराची साफसफाई





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानामध्ये प्रत्येकाचा खारीचा वाटा असेल तरच आपल्या प्रभागासह शहराचेदेखील नाव उंचावले जाते. हेच उद्देश डोळ्यासमोर ठेवून नेरूळ सेक्टर २ मधील इंद्रधनुष्य अपार्टमेंटसह स्थानिक रहिवाशांनी पुढाकार घेतला आहे.

पालिकेच्या वतीने रस्त्यावर कचरा टाकू नये यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना राबवल्या जात असूनदेखील नागरिक रस्त्यावर तसेच इतर मोकळ्या जागेवर कचरा फेकतात. त्यामुळे अनेक ठिकाणी परिसराला बकालपणा आलेला पाहायला मिळतो. नेरूळ परिसरातील कचऱ्याची परिस्थिती पाहिली तर नेरूळ विभागामध्ये अनेक ठिकाणी ओल्या सुक्या कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. त्यामुळे परिसरातील बकालपणा हटवण्यासाठी रहिवाशांनी स्वतः हातात झाडू घेऊन नेरूळमधील परिसर स्वच्छ करत इतरांनाही स्वच्छतेचा संदेश देत संपूर्ण परिसर स्वच्छ केला आहे.

कचरा कुंडी मुक्त शहर करण्यासाठी पालिकेच्या वतीने अनेक प्रभागांमधील कचरा कुंड्या हटविण्यात आल्या आहेत, मात्र अनेक नागरिकांना कचरा कुंड्या का हटविल्या आहेत हेच माहिती नसल्यामुळे अनेक नागरिक रस्त्यावर, मोकळ्या जागेवरच कचरा फेकतात. त्यामुळे अनेक सोसायटीमधील रहिवाशांना तसेच येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नेरूळ सेक्टर २ मधील इंद्रधनुष्य अपार्टमेंटच्या गेट समोर अनेक वेळा नागरिक कचरा टाकतात. परिसरामध्येदेखील कचरा फेकला जातो त्यामुळे इतर परिसरासह अपार्टमेंटच्या गेटसमोरील परिसर स्वच्छ केला आहे.

या परिसरामध्ये येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकसंह इतर सोसायटीतील नागरिकदेखील रात्रीच्या वेळी कचरा फेकतात म्हणून सोसायटी मधील रहिवाशीच इथे रात्रीच्यावेळी गस्त घालत आहे. जेणेकरून ह्या परिसरामध्ये कचऱ्याचे ढीग साचू नयेत. तसेच पालिकेच्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नेरूळ विभागातील कचऱ्याच्या समस्येकडे लक्ष केंद्रित करून उपाययोजना केल्या आहेत.

पालिकेच्या माध्यमातून नेरूळमध्ये प्रत्येक विभागात कचरा टाकू नये असे फलक लावून जनजागृती केली जात आहे. ठिकठिकाणी फलक रंगरंगोटी करण्यात आली आहे. तरीदेखील काही नागरिक कचरा इतरत्र टाकतात हे योग्य नाही, असे स्थानिक रहिवासी संतोष भिसे यांनी सांगितले.

**स्वच्छ भारत अभियानात माझा कचरा, माझी जबाबदारी ही ओळ केवळ घोषवाक्यापुरती मर्यादित न ठेवता नेरूळ विभाग कार्यक्षेत्रातील रहिवासी सोसायट्या आणि नागरिकांनी पुढाकार घेत स्वत: झाडूसह इतर स्वच्छता साधने हातात घेत साफसफाई केली आणि स्वच्छतेचा नवा आदर्श स्वकृतीतून प्रदर्शित केला ही स्वागतार्ह बाब आहे.**
**–बाबासाहेब राजळे,**
**उपायुक्त, नवी मुंबई मनपा**

# रसायनीतील दापिवली गावात जलजीवन मिशन योजनेचा शुभारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील दापिवाली गावात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत नवीन पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्याच्या व गावातील अंतर्गत नवीन पाईप लाईन टाकण्याच्या कामाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम झाला. या योजनेसाठी ग्रूप ग्रामपंचायत वावेघरचे विद्यमान सदस्य दीपक दत्ताराम बरवी, समृद्धी संजय भगत, संध्या संतोष भोईर यांनी अथक परिश्रम घेत ही योजना गावासाठी उपलब्ध करून दिली.

या भूमिपूजनाच्या कार्यक्रमासाठी ग्रूप ग्रामपंचायत सरपंच विजय नामु चव्हान, उपसरपंच श्रुती ज्ञानेश्वर माळी, गुरुनाथ माळी सदस्य, विनोद राठोड सदस्य, प्रकाश गाताडे, मनीषा गाताडे, राम भोईर, वामन भगत, पांडुरंग गाताडे, राजू कसाई, नामदेव हतमोडे, सुरेश गाताडे, प्रशांत भोईर, तेजस भोईर, अलंकार भोईर, सुजित भोईर, राकेश पाटील, राम जांभळे, विनोद भगत, केशव भगत, प्रदीप भोईर, मयूर भोईर, विष्णू भगत, विष्णू गाताडे, संजय भगत हे उपस्थित होते.



# पनवेलमध्ये 'अंनिस'ची राज्यस्तरीय बैठक

**पनवेल : वार्ताहर**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक प्रथमच पनवेलमध्ये होत आहे. पनवेल शहरातील आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात २१ व २२ जानेवारीला होणाऱ्या बैठकीच्या निमित्ताने अंनिसच्या पनवेल शाखेच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या माध्यमातून संत सुधारकांच्या विचारांचा वारसा पुढे चालिण्याचे काम केले जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार, अंगीकार, चिकित्सक वृत्ती निर्माण करणे, संविधानिक मूल्यांची जोपासना करणे तसेच पितृसत्ताक व्यवस्थेत अंधश्रद्धाच्या जोखडात अडकलेल्या समाजाला दिशा दाखविण्याचे काम अंनिस मागील ३३ वर्षे करीत आहे. कला प्रदर्शनातून अंनिस करीत असलेले काम सुधारकांचे विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी कलाप्रदर्शन आयोजित केले आहे. यात अंनिसच्या कार्यकर्त्यांनी अनुभवातून कोणत्याही व्यवसायिक मदतीशिवाय प्रकल्प उभारले आहेत. कला प्रदर्शन आगरी समाज मंडळाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात तळमजल्यावर असेल.

प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांच्या हस्ते होणार आहे. प्रदर्शन सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी मोफत खुले असेल. तसेच पनवेलमधील सर्व हितचिंतक समविचारी लोकांचा स्नेहमेळावा आयोजित केला आहे. यामध्ये उपस्थित राहण्याचे व अधिक माहितीसाठी सिद्धेश ९८७०९११९११ व नाजूका ८९७६८७१३८१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन अंनिसकडून करण्यात आले आहे.

# आवरे येथील जिल्हा परिषद शाळेत गणवेश वाटप

**उरण : वार्ताहर**

कै. निर्मला नामदेव गावंड यांच्या स्मरणार्थ प्रथम पुण्यस्मरणाचा औचित्य साधून श्री. रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा शैक्षणिक व सामाजिक संस्था आवरे यांच्यामार्फत सोमवारी (दि. १६) आवरे येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना पि.टी (स्पोर्टस ड्रेस) गणवेशाचे व खाऊचे वाटप करण्यात आले.



मुख्याध्यापक वार्लेकर व शिक्षक यांच्या मागणी व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या गणवेशांचे वाटप करण्यासाठी गटविकास अधिकारी भोये, विस्तार अधिकारी मिंडे, आवरे गावचे ग्रामसेवक श्री. पाटील, रमाकांत पाटील तसेच संस्थेचे पदाधिकारी व पूर्ण गावंड कुटुंब, कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

गटविकास अधिकारी भोये यांनी आपल्या मनोगतामधून शालेय परिसरासंदर्भात व विद्यार्थ्यांचे ड्रेस कोट संदर्भ समाधान व्यक्त केले. तसेच या गावातील रा. ग. गावंड सामाजिक संस्था नेहमीच शाळेला मदत करत असते असेच सामाजिक कार्य करत रहा हेच उदाहरण मी नेहमी आता माझ्या इतर शाळांनादेखील देईन, असे त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

रमाकांत पाटील, सहाय्यक शिक्षक निर्भय म्हात्रे, नितीन गावंड, डॉक्टर संदेश, सुनील गावंड, नामदेव गावंड, गणेश गावंड, अनिल गावंड, संदीप गावंड, नवनीत गावंड, साईनाथ गावंड, रुपम गावंड, कविता गावंड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्भय म्हात्रे यांनी केले आभार मुख्याध्यापक यांनी करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# परदेशातही होतोय मराठीचा जागर

## कवी अशोक नायगावकर यांचे प्रतिपादन



**नवी मुंबई : बातमीदार**

आपल्या मराठी घरातील मुले रोजगार, व्यवसायानिमित्त संपूर्ण जगभरात विविध देशांमध्ये जात असून त्यांच्या माध्यमातून तिथेही मराठी संस्कृतीची मुळे रुजत आहेत ही आपल्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे, असे प्रसिध्द कवी अशोक नायगावकर यांनी सांगितले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार १४ ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत साजरा करण्यात येत असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा शुभारंभावेळी नमुंमपा मुख्यालयातील म्फीथिएटर येथे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात अशोक नायगावकरांनी उपस्थितांसोबत दिलखुलास संवाद साधला.

नुकत्याच झालेल्या नायगावकरांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून नवी मुंबईकर नागरिकांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी नायगावकरांच्या पत्नी शोभना नायगावकर यांचाही सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे या वेळी उपस्थित होते.

**आज शुध्दलेखनाबाबत संवाद**

*नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून गुरुवारी (दि. १९) भाषा अभ्यासक वैभव चाळके 'शुध्दलेखनाच्या दिशेने.' या विषयांतर्गत सकाळी ११ वाजता शुध्दलेखनाचे शासकीय नियम व लेखन या विषयावर मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात सुसंवाद साधणार आहेत.*

महापालिका आयुक्त नार्वेकर यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे सांगत यावर्षीच्या भाषा संवर्धन पंधरवड्याची सुरुवात अशोक नायगावकर यांच्या उपस्थितीत होत आहे हा आनदयोग असल्याची भावना व्यक्त केली. या वेळी कवी अशोक नायगावकर यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत निर्णय या जनजागृतीपर लघुचित्रफितीचे अनावरण करण्यात आले. तसेच उपस्थितांसह स्वच्छतेची सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली.



# मानसरोवर स्टेशन परिसरात आग

**नवी मुंबई : बातमीदार**

मानसरोवर स्थानकामध्ये सीएसएमटी दिशेने जाणाऱ्या मार्गालगत गवताळ भागात कचऱ्याला मंगळवारी (दि. १७) दुपारी २.१५ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. काही क्षणात या आगीने रुद्ररूप धारण केल्याने दुपारी सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेसेवा काही काळ मानसरोवर स्थानकात थांबवण्यात आल्या. परिणामी हार्बर मार्गावरील वाहतूक १५ ते २० मिनिटे उशिराने सुरू होती.

मानसरोवर स्थानकाबाहेर मोठ्या प्रमाणात गवताळ परिसर आहे. स्थानकात ये-जा करण्यासाठी याच परिसरातून प्रवाशांसाठी एक पायवाट आहे. मंगळवारी दुपारी रेल्वेरुळांलगत असणाऱ्या गवताळ भागात आग लागली. सुरुवातीला कचऱ्याने पेट घेतल्याचा समज होत रेल्वे सुरळीत सुरु होत्या, मात्र अवघ्या काही वेळातच या आगीने रुद्ररूप धारण करत आगीच्या धुराचे लोट रेल्वे रुळांवर येऊ लागले. ही बाब लक्षात येताच प्रवाशांनी स्थानकातील आरपीएफ जवानांना बोलावले. यावेळी सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या लोकल मानसरोवर स्थानकात थांबवण्यात आल्या. रेल्वे पोलीस आणि अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी २० मिनिटांनी या आगीवर नियंत्रण मिळवले.

# रसायनीत ३५ शाळांमध्ये विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी अन् चष्मे वाटप

मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आर. झुनझुनवाला संकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने हाती घेण्यात आलेल्या रसायनी-पाताळगंगा परिसरातील सुमारे ३५ प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या नेत्र तपासणी करण्याच्या कार्याचे उद्घाटन महिला उद्योग मंडळाच्या प्राथमिक शाळेपासून सोमवारी (दि. १६) सकाळी १२ वाजता झाले. हे शिबिर रसायनी परीसरातील शाळांत आठवडाभर असणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष अध्यक्ष अमित शहा होते. या वेळी सचिव डॉ. धीरज जैन, माजी अध्यक्ष गणेश काळे, रो. शशिकांत शानभाग, उमा मुंढे, शारदा काळे, मेघा कोरडे, ॲने अनुराधा होनावळे, ॲनेट युगेश कोरडे, महिला उद्योग मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, सचिव सुनंदा कुलकर्णी, कार्याध्यक्ष अरुण गायकवाड, मुख्याध्यापक महादेव पाटील, मुख्याध्यापिका सुप्रिया गायकर आदी उपस्थित होते.

नेत्र तपासणीसाठी आलेल्या सर्वांचा परिचय रोटरीचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण होनावळे यांनी करून दिल्यावर त्यांना गुलाब पुष्प देवून सन्मानित करण्यात आले. या टीममध्ये रोहिणी खाडे ( टीम लीडर), सपना शर्मा, सहेरिष मुल्ला, श्रुती पाटील, निखिल येवले आणि संजीव जोशी यांचा समावेश होता. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रकल्पाचा उद्देश, कालावधी, समाविष्ट शाळा, फायदे प्रकल्प समन्वयक होनावळे यांनी सांगितले. मुख्याध्यापक महादेव पाटील यांनी आभार मानले.



# शेतातील पेंढ्यांचे माच लुप्त होण्याच्या मार्गावर

(छाया : राकेश खराडे)



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड हे भाताचे कोठारे म्हणून प्रचलित असून सध्या ह्याच शेतीला औद्योगिक करणांचे ग्रहण लागले असल्यामुळे भात शेती कमी होत चालली आहे. शेती अल्प असल्यामुळे पारंपरिक पध्दतीने शेती न करता तांत्रिक पध्दतीने शेती केली जाते. परिणामी शेतक-याच्याजवळ असलेली गुरे कमी प्रमाणात झाल्यामुळे लाकडी माच बनवून त्यावरती पेंढा साठविण्याची कला लुप्त होत चालली आहे.

पुर्वी शेती ही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतक-याजवळ गुरे ही खूप असायची, मात्र गेल्या काही वर्षात औद्योगिकरण तसेच शेतीचे विभाजन झाल्यामुळे शेती ही तुकड्यामध्ये विभागली गेली. त्यातच काही मुंबईसारख्या धनीकांनी आपली जमिन घेवून त्या ठिकाणी बंगले बांधले गेले आहे. परिणामी लागवडीचे क्षेत्र कमी होत चालले आहे. त्यातच सातत्याने बदलत असलेले हवामान यामुळे मतीत टाकलेला पैसा मिळत नसल्यांची खंत शेतकरी वर्ग करीत आहे. यामुळे शेती लागवड करण्यापेक्षा ती ओसाड पडत चालली आहे.

शेती करणे म्हणजे पुरेसे मनुष्य बळ असणे गरजेचे असते मात्र आता विभक्त कुटुंब उदयास आल्यामुळे एकट्या व्यक्तीला शेती करणे अशक्य होत आहे. त्याचबरोबर शेती नाही तर गुरे नाही. यामुळे पेंढा जमा साठविण्याचे प्रकार बंद झाले, मात्र आजही ग्रामीण भागात लाकडी माच रचून पेंढा साठविण्याची पद्धत ग्रामीण भागात तुरळक ठिकाणी अनुभवास मिळत आहे.

# स्मशानभूमीलगत तरुणाने घेतला गळफास

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागझरी-काटेपाडा येथील स्मशानभूमीच्या बाजूस एका व्यक्तीने गळफास घेतल्याची घटना घडली आहे.

तुकाराम सखाराम बांबोटे (वय २५) असे या गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. भाऊ लक्ष्मण बांबोटे यांनी याबाबत माहिती दिली. नागझरी काटेपाडा येथील स्मशानभुमीच्या बाजुस लोखंडी पायपाला तुकारामने गळफास घेतला होता. त्याला उपचारसाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून त्याला मयत घोषित केले.




**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, २२ जानेवारी २०२३ रोजी वाचूया डॉ. कुमार ननावरे यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

# औद्योगिक क्षेत्रात मंदी, रासायनिक कारखान्यांवर परिणाम

## धाटाव क्षेत्रात ४० ते ५० टक्क्यांच्या क्षमतेने कारखाने सुरू / शासनाने लघू, मध्यम उद्योगांना सावरण्याची गरज

**रोहा : प्रतिनिधी**

रशिया युक्रेन युद्धाचे सावट, सर्वात मोठी बाजारपेठ व कच्च्या मालाचे निर्यातदार असलेल्या चीनवर आलेले मंदीचे सावट तर दुसरीकडे जागतिक बाजारपेठेत उत्पादित मालाला भाव नाही असे असताना कच्च्या मालाचे मात्र भाव वाढल्याने त्याचा परिणाम थेट उद्योगावर होताना दिसत आहे. देशातील लघु व मध्यम रासायनिक सह अन्य कारखाने आज मंदीचा सावटाखाली दिसून येत आहेत.औद्योगिक क्षेत्रात आलेले मंदी याचा परिणाम धाटाव औद्योगिक क्षेत्रात सह सर्वच रासायनिक कारखान्यावर होताना दिसत आहेत.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यासह सर्वच रासायनिक कारखाने आज ४० ते ५० टक्के क्षमतेने चालू असल्याचे दिसून येत आहे. यातील बहुतांशी अशा कारखान्यात ४० ते ५० टक्के उत्पादन चालू असून कारखान्यातील



काही विभाग कारखानदार बंद ठेवत आहेत. तर काही कारखाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत छोटे रासायनिक व अन्य कारखान्यांना प्रतिकूल परिस्थितीतही सक्षमपणे उभे राहण्यासाठी शासनाने मदत केली पाहिजे.

रायगडात रोहा धाटाव, महाड बिरवाडी, तळोजा, रसायनी, पाली सुधागड, खोपोली येथे मोठ्या प्रमाणात रासायनिक कारखाने आहेत. विशेषता रायगड जिल्ह्यातील सर्वात जुनी अशी ओळख असलेल्या धाटाव औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रासायनिक कच्चा व पक्का माल उत्पादित करणारे कारखाने आहेत. या कारखान्यातून औषधासाठी लागणारे रसायन, रंगद्रव्य, रबर यास अन्य रासायनिक उत्पादन या कारखान्यातून काढले जाते.

या कारखान्यातून निघालेल्या उत्पादनाला देशांतर्गत युरोप, अमेरिका, चीन देशात उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध असते.परंतु मोठ्या प्रमाणात असलेली ही बाजारपेठ आज विविध कारणास्तव उपलब्ध होताना दिसत नाही. त्यामुळे जास्त निर्यात क्षमता असतानाही निर्यात थंडावले असल्याने मालाला उठाव नाही. चीन सुद्धा मंदीच्या गर्तेत असल्याने मिळणारा कच्चा माल यावर परिणाम झाला आहे. परंतु यापुढेही जाऊन कच्चामाल मिळेल याची शाश्वती नाही. कोविड काळापासून कच्च्या मालाचा पुरवठा कमी होताना दिसत आहे. कच्चामाल पुरवठा होत नाही. त्याचबरोबर या कच्च्या मालाचे आज किमती वाढल्या आहेत. परदेशात बाजारपेठ उपलब्ध नाही परंतु देशांतर्गत मालही उठाव नसल्याने याचा थेट परिणाम जिल्ह्यातील रासायनिक कारखान्यावर होत आहे.

मालाला उठाव नसल्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे युक्रेन रशिया युद्ध चालू असल्याने अमेरिका व युरोप बाजारपेठ उत्पादित मालाला मिळत नाही. तर दुसरीकडे चीन मंदीच्या गर्तेत असल्याने चीनकडून कच्चामाल मिळत नाही. महाग कच्चामाल मिळाला तरीसुद्धा उत्पादन केल्यानंतर कारखानदारांना बाजारपेठ उपलब्ध होत नाही. त्याचा थेट निर्यातीवर परिणाम झाल्याने उत्पादित मालाला मागणी खूपच कमी आहे.

उत्पादित मालाला मागणी नसणारे कारखान्याची आर्थिक परिस्थिती बिकट होताना दिसत आहे. यामुळे थरोहा धाटाव औद्योगिक क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षात असा मंदीचा अनुभव आला नव्हता अशी मंदी आज अनुभवायला मिळत असल्याचे कारखानदार सांगत आहेत.

**“ २०२२ वर्ष संपून २०२३ या वर्षाला सुरुवात झाली आहे. सध्य परिस्थितीचा अनुभव घेतल्यास २०२३ साल हे सुद्धा प्रचंड मंदीचे असणार असे औद्योगिक क्षेत्रातील जाणकार सांगत असल्यामुळे कारखानदारांचे २०२३ मध्ये काय होणार याकडे डोळे लागले आहेत.आलेली मंदी पाहता निश्चितच त्याचा परिणाम नोकरावर सुद्धा होणार आहे.त्यामुळे शासनाने छोट्या रासायनिक कारखान्यांना मंदीच्या काळातही उभे राहण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याची आवश्यकता आहे.**

**–पी. पी. बारदेशकर, रोहा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष**

### कारखानदारांना प्रोत्साहनाची गरज

***देशातील रोजगार मध्यम व लघु क्षेत्राकडे जास्त आहे जवळजवळ ७२ टक्के रोजगार मध्यम व लघु क्षेत्रात आहे.त्यामुळे हा क्षेत्र वाचवण्याची गरज आहे. यासाठी छोट्या रासायनिक कारखान्यांना दिलेले बँकेने कर्ज यावर सवलतीची गरज आहे. शासनाच्या रासायनिक कारखान्यासाठी असलेल्या काही अटी शिथील करण्याची आवश्यकता आहे. दुसरीकडे या कारखानदारांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. तरच भविष्यात लघु व मध्यम उद्योग आपल्या पायावर स्थिरपणे उभे राहतील.***

---

## मोरे महाविद्यालयात उडाण महोत्सव



**रोहा : प्रतिनिधी**

सोमवारी मुंबई विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्यावतीने द. ग. तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय तळा येथे उडाण महोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले. मोरे महिला महाविद्यालयाच्या १६ विद्यार्थिनींनी या महोत्सवातील पथनाट्य सादरीकरण, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व आदी स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य सादर केले आणि परीक्षकांची वाहवा मिळविली.या स्पर्धांसाठी विद्यार्थिनींनी मोरे महिला महाविद्यालयातील 'आजीवन अध्ययन आणि विस्तार समिती' च्या प्रमुख निर्मला थोरात आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्ना म्हसळकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.

---

## रोहा येथे अवैध गांजा पकडला

### विक्रेत्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातील रोहा चणेरा मार्गावरील म्हाडा कॉलनीतील एका बंद इमारतीमध्ये गांजा विक्रीस आणलेल्या विक्रेत्याला रोहा पोलिसांनी पकडले आहे. रोहा पोलिसांनी त्या गांजा विक्रेत्याकडून १९ हजार ५६ रुपयाचा गांजा जप्त केला आहे.रोहा पोलिसांची अवैध धंद्याच्या विरोधात धडक मोहीम सुरू असून या अंतर्गत अवैध धंदे बंद करण्यासाठी रोहा पोलिसांनी मोहीम आखली आहे. रोहा शहरात अवैद्यरित्या गांजा विक्रीला येत असल्याची रोहा पोलिसांना माहीती मिळताच रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलिसांनी मंगळवारी म्हाडा कॉलनी येथे अवैध गांजा या मादक व नशाकारक अंमली पदार्थाची अवैधरीत्या विक्री करण्याकरता आलेल्या म्हाडा कॉलनी येथील बंद इमारतीमध्ये आरोपीकडून पोलिसांनी गांजा जप्त केला आहे.रोहा पोलिसांनी आरोपीतकडून १.६०५ किलोग्रॅम वजनाचा गांजा हा मादक व नशा कारक पदार्थ लाल पिवळ्या रंगाच्या पिशवीमध्ये ठेवलेला १२००० रुपये प्रति किलो प्रमाणे वजनाचे असे एकूण १९०५६ किमतीचा मुद्देमाल रोहा पोलिसांनी जप्त केला आहे या संबंधित आरोपीच्या विरोधात रोहा पोलीस ठाण्यात एनडीपीएस अधिनियम १९८५ चं.क.८(क),२०(ब) त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे या संबंधित अधिक तपास रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर हे करीत आहेत.

---

## सुप्रसिध्द सिद्धिविनायक यात्रा होणार

### *चिटणीस–गुप्ते ट्रस्ट व ग्रामस्थांत सकारात्मक चर्चा*

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या सुप्रसिद्ध श्री सिद्धिविनायकाच्या माघी उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे भरविण्यात येणारी यात्रा यावर्षी कोरोनासह अन्य कारणे दाखवित यात्राच रद्द करण्याचा घाट मंदिराच्या चिटणीस–गुप्ते कौटुंबिक ट्रस्टने घातला. चक्क नांदगाव ग्राम पंचायतीला तसे पत्र देत यात्रा कायमस्वरूपी भरविण्यास असमर्थता व्यक्त केली होती. परंतु नांदगाव ग्रामस्थ व चिटणीस गुप्ते ट्रस्टमध्ये चर्चा होऊन यामधून सकारात्मक तोडगा काढण्यात येऊन यात्रा चिटणीस गुप्ते ट्रस्ट व सिद्धिविनायक सेवा मंडळ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यात्रा भरवण्याचे ठरवण्यात येऊन नांदगाव ग्रामस्थ या यात्रेला सहकार्य करण्याचे ठरले आहे. त्यामुळे यंदा सुद्धा यात्रा उत्सहात साजरी करण्यात येणार आहे.

यात्रा होण्यासाठी विशेष सभेचे गठन करण्यात येऊन यामध्ये यात्रा साजरी करण्याचे ठरवण्यात आले आहे. या मंदिराच्या चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्टने ४ जानेवारी रोजी नांदगाव ग्रामपंचायतीला एक पत्र पाठवून यावर्षी २५ जानेवारी रोजी होणाऱ्या माघी उत्सवादरम्यान मंदिरा समोरील पटांगणात यात्रा भरणार नाही असे कळविले. त्यामुळे नांदगावमधील ग्रामस्थांसह पंचक्रोशीत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत होत्या.

निर्णयाविरुद्ध ग्रामस्थांनी एल्गार पुकारला. ग्रामपंचायतीतर्फे कार्यालयात एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच विद्याधर चोरघे होते. वेळीच गुप्ते चिटणीस मंडळाशी सकारात्मक चर्चा होऊन यावर तोडगा निघाल्यामुळे २५ जानेवारी रोजी यात्रा मोठ्या उत्सहात साजरी करण्यात येणार आहे.

---

## जिल्ह्यात कातकरी समाजाच्या ७४,४७८ मतदारांची नोंदणी पूर्ण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार १ जानेवारी २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यातील विशेषतः असुरक्षित आदिवासी गटातील सर्व पात्र मतदारांची १०० टक्के नोंदणी करण्याचे निर्देश दिले होते.




त्याअनुषंगाने रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये ठिकठिकाणी आदिवासी मतदार नोंदणीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पूर्वी आदिवासी समाजातील ७१ हजार ८८० इतकी मतदार नोंदणी झाली होती. तसेच या पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २ हजार ५९८ एवढी नोंदणी झाली आहे. जिल्ह्याच्या कातकरी समाजाच्या १ लाख १९ हजार ५७३ लोकसंख्येपैकी एकूण ७४ हजार ४७८ मतदार नोंदणी झाली आहे, अशी माहीती उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे यांनी दिली.

---

## पेण आरटीओतर्फे बाईकस्वारांना हेल्मेट वाटप





**पेण : प्रतिनिधी**

राज्य रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रायगडमध्ये पेण उप प्रादेशिक परिवहन विभागातर्फे अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त पेणजवळील खारपाडा येथील जुना टोल नाका येथे बाईक स्वारांची कागदोपत्री तपासणी करत हेल्मेट नसणाऱ्या वाहनचालकाला तसेच त्याच्या पाठी बसलेल्या व्यक्तीला पेण आरटीओतर्फे हेल्मेटचे वाटप करण्यात आले.यावेळी उपस्थीत सर्व वाहनचालकांना वाहतू नियमांचे मार्गदर्शन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकरी माधव सूर्यवंशी तसेच शशिकांत तिरमे या आरटीओ अधिकाऱ्यांनी केले.

यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी वाहनचालकांना मार्गदर्शन करताना रस्ता सुरक्षा अभियाना बाबत माहिती दिली त्याचप्रमाणे रस्त्यावरून गाडी चालवताना हेल्मेट व सिट बेल्ट लावणे गरजेचे असल्याने,घडणाऱ्या अपघातात प्राण वाचले जावू शकतात, वाहन चालवताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करून गाडी चाळवण्या बाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी मोटार बिम कंपनीचे पार्थ गोवील व सहकाऱ्यांकडून आयएसआय मार्क असलेले (स्टीलवर्ड) हेल्मेट देण्यात आले. यावेळी पेण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी, मोटार वाहन निरीक्षक शशिकांत तिरमे, अनिल बागवान, सुरेश तुरकणे, प्रशांत बच्छव, सहायक वाहन निरीक्षक नंदन राऊत, दत्तात्रय जगताप अभिजीत तेरी, जगनाडे, दिनेश शर्मा, समीर चव्हाण आदी आर टो ओ अधिकारी उपस्थित होते.

---

## पेण पाचगणीत विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील पाचगणी आदिवासी वाडीतील तरुणाचा पेण शहरातील म्हाडा कॉलनी येथे एका खासगी बांधकामावर पाणी मारताना विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी, पेण तालुक्यातील पाचगणी डोंगराळ भागात असणारी काही आदिवासी कुटुंबे उदरनिर्वाहासाठी शहराच्या आजूबाजूला झोपड्या बांधून राहत आहेत.

अंतोरे फाटा येथेही काही कुटुंबे राहत असून यातील मोलमजुरी करणारा जयराम गोविंद पारधी (वय २०) हा मंगळवार १७ जानेवारी रोजी सकाळी ८: ३० वाजण्याच्या सुमारास शहरातील म्हाडा कॉलनी येथील एका घराच्या बांधकामावर पाणी मारत होता. त्या वेळी त्याला विजेचा धक्का लागला. यावेळी त्याला उपचारासाठी पेणच्या उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले तेथे त्याला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याबाबत सख्या गोविंद पारधी यांनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.


---

## शिवचरित्र वाचणे काळाची गरज –संभाजी भिडे

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रेरणा श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान नागोठणे विभागाच्यावतीने रविवारी (दि. १५) सायंकाळी सात वाजता गुरुवर्य संभाजी भिडे गुरुजी यांच्या श्री शिव शंभू चरित्र धारातीर्थ गडकोट मोहीम रायगड पुर्नस्थापित होणारे ३२ पण सुवर्ण सिंहासन हिंदवी स्वराज्य खडा पहारा आदी विषयी मार्गदर्शनपर व्याख्यानात समाज घडवण्यासाठी शिवाजी महाराज व संभाजी महाराज याशिवाय दुसरा मंत्र नाही. त्यासाठी शिवचरित्र वाचणे काळाची गरज असल्याचे भिडे गुरुजी यांनी सांगितले

हजारो धारकरी व विभागातील नागरिकांचा साक्षीने प्रेरणा मंत्राने सुरू झालेल्या व्याख्यानात गुरुवर्य भिडे गुरुजी यांनी देव देश आणि धर्म यासाठी जगणारा समाज निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे. संपूर्ण देश आम्हाला शिवाजी आणि संभाजी यांच्या रक्तगटाचा हिंदवी स्वराज्याचा दिवा काळजात लावणारा समाज आम्हाला निर्माण करायचा आहे. जिथे जिथे हिंदवी स्वराज्याचा ओंकार आहे तेथे तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे अस्तित्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्राचे नव्हे ते राष्ट्र आणि धर्म यासाठी लढले. तुळजा माता



हीचज खरी भारत माता असून छत्रपती शिवाजी महाराज हे तुळजाभवानीशी एकरूप झाले होते. महाराजांवर नाटक आणि चित्रपट तयार झाले त्यातून लोक कितपत जागे झाले असे गुरुजींनी विचारून अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभारले गेले त्याचे कोण कधी दर्शन घेतो काय? असे प्रश्न उपस्थित केले.

अतिशय शिस्तबद्ध झालेल्या या व्याख्यानात भिडे गुरुजींनी २८ जानेवारी ते एक फेब्रुवारीपर्यंत घेण्यात येणाऱ्या गडकोट मोहिमेबाबत माहिती देताना या

### प्रत्येकाने उपासना करणे गरजेचे!

*हिंदू समाज टिकवायचा असेल तर यावर एकच उपाय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा मंत्र, त्यांची उपासना करणे गरजेचे असून प्रत्येकाने शिवचरित्राचे वाचन केले पाहिजे. महाराष्ट्रात मोर्चे काढून लव जिहाद संपणार नाही तर त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अवलंबलेला उपाय हाच हा रोग मुळासकट नष्ट करणारा रामबाण औषध असल्याचे गुरुजींनी सांगितले.*

मोहिमेत सहभागी होणाऱ्या धारकरी यांनी २८ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता श्री भीमाशंकर येथे पोहचावे.

मोहिमेची सुरुवात रविवारी २९ जानेवारी रोजी पहाटे साडेपाच वाजता श्री तुळजा मातेच्या आरतीने होणारा असून ही मोहीम श्री वरसुबाई मार्गे श्री शिवनेरी येथे बुधवार एक फेब्रुवारी रोजी आल्यानंतर मोहिमेचा समारोप होणार असल्याचे सांगितले. जास्तीत जास्त संख्येने धारकरींनी सहभागी होण्याचे आवाहनही शेवटी गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजींनी यावेळी केले. या व्याख्यानाची सांगता श्लोक पठणांनी झाली.

---

## रोह्यातील धोंडखार येथे गावठी दारुची भट्टी उद्ध्वस्त

### पोलीस आणि वनविभागाची संयुक्त कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धोंडखार परीसरात गावठी दारू तयार होत असल्याची माहीती मिळताच रोहा पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलीस



व वनविभागाच्या पथकाने या गावठी दारुची भट्टी उध्वस्त केली आहे

रोहा पोलीस ठाणे हद्दीत धोंडखार गावचे हद्दीत जंगल भागात अवैध गावठी दारू तयार करणाऱ्या भट्ट्यांचा शोध घेण्यात आला. यावेळी धोंडखार येथील जुने पडीक शौचालय शेजारी ठेवलेले गूळ मिश्रित रसायन भरलेले ४ कॅन मिळून आले. यामध्ये ८२,०००/– रु ५०० लिटर क्षमतेचे गूळ मिश्रित रसायन भरलेले २ प्लॅस्टिक कॅन प्रति लिटर ४० रु रसायन व प्रती कॅन ५०० रु प्रमाणे होते. हा मुद्देमाल वाहतुकीस अडचणींचा असल्याने जागीच ओतून व कॅन जाळून नष्ट करण्यात आला आहे.

या कारवाईसाठी रोहा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक हिवरकर, साहाय्य पोलिस उपनिरीक्षक मदगे, पोलीस नाईक ठाकूर, पारवे, कुथे व वन वीभाग रोहाचे वनपाल श्री. हंबीर यांनी कारवाईत भाग घेतला होता.

---

## मुरुडमध्ये ‘कोमसाप’तर्फे विविध कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा मुरुडतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कै. गजानन (भाऊ) बागडे स्मृती समारोह (साहित्यिक मैफिल) १९ जानेवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ या कालावधीत मुरुड येथील अरुण बागडे यांच्या निवासस्थानी साहित्यिक मैफिल होणार आहे. येथे रायगड जिल्ह्यातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रभावी सूत्रसंचालन व वक्तृत्वकला आत्मसात करण्यासाठी कार्यशाळा २१ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १२या वेळेत वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड येथे होणार आहे.

जागर माय मराठीचा २३ जानेवारी रोजी सार्वजनिक वाचनालय, मुरुड येथे सायंकाळी ४ ते ६ या वेळेत होणार आहे. महाविद्यालयीन तालुकास्तरीय काव्यवाचन स्पर्धा २४ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १२ या वेळेत वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड येथे होणार आहे. महाविद्यालयीन तालुकास्तरीय निबंधलेखन स्पर्धा २७ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १२या वेळेत वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय येथे होणार आहे. सर्व कार्यक्रमांना रसिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण मुरुड तालुका शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी केले आहे.

## राज्यस्तरीय तायक्कांदो पुमसे स्पर्धा

# रायगडला सांघिक अजिंक्यपद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने अहमदनगर येथे आयोजित राज्यस्तरीय पुमसे तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेत रायगड जिल्हा संघाने एकूण २१ पदके मिळवून १९३१ गुणांसह सांघिक विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत नवी मुंबई व रायगडच्या खेळाडूंनी २१ विविध गटांमध्ये रायगड जिल्ह्यातर्फे सहभाग घेतला होता. यामध्ये खेळाडूंनी १४ सुवर्ण, तीन रौप्य व चार कांस्यपदकांसह एकूण २१ पदके मिळवून रायगडला सांघिक विजेतेपद प्राप्त करून दिले.




स्वराली माटेकर हिने सब-ज्युनिअर वैयक्तिक मुलींच्या गटात सुवर्णपदक पटकावून स्पर्धेची सुरुवात, तर अमोल माळीने ४० वर्षाखालील वैयक्तिक पुरुष गटात सुवर्णपदक जिंकून सांगता केली. रोहित सिनलकर व प्रथम ठोंबरे यांनी प्रशिक्षक म्हणून आणि हुसेन शेख व निखिल ठुबे यांनी व्यवस्थापक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली. यातील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली असून त्या स्पर्धेतून भारतीय संघाची निवड करण्यात येणार आहे.

प्रशिक्षक रोहित सिनलकर यांची १९ ते २१ जानेवारीदरम्यान तामिळनाडूतील नमक्कल येथे होणाऱ्या राष्ट्रीय पुमसे तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे.

विजेत्या संघातील खेळाडूंचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांच्यासह नवी मुंबई मनपा विस्तार अधिकारी सुलभा बारघरे, मुख्याध्यापक मारुती गवळी, अमॅच्युअर तायक्कांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष ॲड. प्रज्ञा भगत, सचिव सचिन माळी, उपाध्यक्ष संजय भोईर, खजिनदार रोहित सिनलकर आदींनी अभिनंदन केले, तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# दुखापतग्रस्त नदाल 'आऊट'

## ऑस्ट्रेलियन ओपन

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

गतविजेता राफेल नदाल ऑस्ट्रेलियन ओपनमधून बाहेर झाला आहे. त्याला स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत सरळ सेटमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. अमेरिकेच्या मॅकेन्झी मॅकडोनाल्डने नदालचा ६-४, ६-४, ७-५ असा पराभव करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. मॅकडोनाल्डने वर्षातील पहिल्या ग्रँड स्लॅममध्ये अव्वल मानांकित नदालविरुद्ध त्याच्या कारकिर्दीतील सर्वांत मोठा विजय मिळवला.

मॅकडोनाल्डने सामन्याची चमकदार सुरुवात केली आणि पहिल्या सेटपासूनच तो चांगला खेळ दाखवत होता. नदालही सुरुवातीला चांगल्या फॉर्ममध्ये दिसत असला तरी तो सामन्याच्या मध्यात जायबंदी झाला आणि त्याची लय बिघडली. याचा फायदा घेत मॅकडोनाल्डने स्पर्धेतील सर्वांत मोठा अपसेट खेचून आणला. त्याने अत्यंत चांगली सर्व्हिस करून फायदा उठवला. दुसरीकडे नदालने एक त्रुटी असलेल्या सर्व्हिस गेमने सुरुवात केली. मॅकडोनाल्डने त्याच्या हालचालीने दबाव आणत आणि सतत नदालवर हल्ला करीत विजय मिळविला.

मागील वर्षी नदालने ऑस्ट्रेलियन ओपनचा किताब जिंकला होता. अंतिम फेरीत त्याने डॅनिल मेदवेदेवचा २-६, ६-७, ६-४, ६-४, ७-५ असा पराभव करीत ऑस्ट्रेलियन ओपनवर स्वतःचे नाव कोरले होते.



### संघर्ष आणि हार

३६ वर्षीय नदालला सामन्यादरम्यान पाठीच्या दुखापतीला सामोरे जावे लागले होते. यामुळे त्याला काही काळ ब्रेकही घ्यावा लागला होता. विश्रांतीनंतर नदाल पुन्हा कोर्टवर परतला, पण तो जुन्या लयीत दिसला नाही आणि त्याला पराभवाला सामोरे जावे लागले. या सामन्यादरम्यान नदाल सतत संघर्ष करीत होता. त्याला कोर्टवर संघर्ष करताना पाहून त्याची पत्नी मारिया फ्रान्सिस्काही रडू लागली.



# क्रिकेट स्पर्धेत अष्टमी संघ प्रथम

**धाटाव : प्रतिनिधी**

श्री धावीर महाराज असोसिएशनच्या मान्यतेने अष्टमी येथील मैदानावर दर्या किनारा अष्टमी क्रिकेट मंडळातर्फे क्रिकेट स्पर्धा नुकतीच रंगली. या स्पर्धेत यजमान अष्टमी संघाने प्रथम क्रमांक पटकाविलला.

स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला होता. द्वितीय क्रमांक राधामाधव भुवनेश्वर संघ, तृतीय विरझोली संघ आणि चतुर्थ क्रमांक मराठा वॉरियर्स संघाने मिळविला. विजेत्या सर्व संघांना रोख रक्कम व चषक देण्यात आले. मालिकावीर सुरज कोळी, उत्कृष्ट फलंदाज सुरज वाटाडे, उत्कृष्ट गोलंदाज ऐनकर, अंतिम लढतीचा सामनावीर म्हणून हरेश ऐनकरला गौरविण्यात आले. या वेळी चंदू पार्टे, हर्षद साळवी, सागर भोबड, यतीन धुमाळ उपस्थित होते.

# सरफराजच्या शतकाला अमोल मुजुमदारचा अनोखा सलाम

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी ट्रॉफीमध्ये दिल्लीविरुद्ध मुंबईसाठी मंगळवारी सरफराज खानने पुन्हा एकदा शतक झळकावले. यानंतर सर्फराज स्वतःची मूठ आवळून पॅव्हेलियनकडे पाहून आनंद साजरा करीत गर्जना करताना दिसला. त्याच वेळी पॅव्हेलियनमध्ये बसलेले मुंबईचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार आपली पनामा कॅप काढून शतकाला सलाम करताना दिसले.

सरफराज खानचे हे शतक सामान्य नव्हते. म्हणूनच अमोल मजुमदार यांनी केलेले हे अभिवादनही खास ठरले. रणजी ट्रॉफीच्या शेवटच्या २३ डावांमधील सरफराजचे हे १०वे शतक ठरले. आजकाल क्रिकेट जगतात सरफराजबद्दल बरीच चर्चा होत आहे. एकेकाळी मुजुमदारच्या बाबतीतही अशीच चर्चा असायची आणि एक-दोन वर्षे नाही तर अनेक दशके तो दमदार धावा करणारा खेळाडू होता, पण



तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळत राहिला व त्याला राष्ट्रीय संघासाठी खेळण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळेच मुजुमदार यांचे हे 'पनामा कॅप सॅल्युट' ही सरफराजच्या या गर्जनेत दडलेली वेदना जाणवत असल्यासारखे काहींनी म्हटल्याचे दिसले, कारण सरफराज खानदेखील अनेक वर्षे चांगले क्रिकेट खेळत असून त्याला भारतीय संघात स्थान मिळत नाहीए.

अमोल मुजुमदार सध्या मुंबईचे प्रशिक्षक आहेत. त्यांच्या कारकिर्दीवर नजर टाकल्यास त्यांनी त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीत १७१ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. १९९४ साली मुंबई संघातून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या मुजुमदारने आपल्या २० वर्षांच्या कारकिर्दीत १७१ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४८च्या सरासरीने ११ हजार १६७ धावा केल्या. मुजुमदार यांनी २००६-०७मध्ये मुंबई रणजी संघाचे कर्णधारपदही भूषविले.

रणजी ट्रॉफीच्या इतिहासात सर्वाधिक धावा करणारा मुजुमदार हा दुसरा फलंदाज आहे. त्याने आंध्र प्रदेश संघासाठी नोव्हेंबर २०१३मध्ये महाराष्ट्राविरुद्ध शेवटचा सामना खेळला. सप्टेंबर २०१४मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. यानंतर त्याने प्रशिक्षक म्हणून काम पाहायला सुरुवात केली आणि तेव्हापासून ते अनेक संघांचे प्रशिक्षक आहेत. सध्या तो मुंबई संघाचा प्रशिक्षक असून या रणजी स्पर्धेत तो खेळाडूंना प्रोत्साहन देताना दिसत आहे.

# वैभव थोरात, मोईनुद्दीन यांना राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत 'सुवर्ण'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती संभाजीनगरमधील गारखेडा येथील क्रीडा संकुलात आयोजित राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत वैभव थोरात आणि मोईनुद्दीन यांनी सुवर्णपदक पटकाविले. विशेष म्हणजे त्यांनी प्रथमच राष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे.

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या या स्पर्धेस पॉवरलिफ्टींग इंडियाची मान्यता असून स्पर्धेसाठी विलास (बापू) भुमरे प्रतिष्ठानचे सहकार्य लाभले आहे. ज्युनिअर स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या दोन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत दोन सुवर्णपदके प्राप्त केली. ज्युनिअर स्पर्धेमध्ये ५९ किलो वजनी गटात वैभव थोरात आणि ८३ किलो गटात मोईनुद्दीन यांनी सुवर्णपदक जिंकले.

याबाबत स्पर्धा सहाय्यक सुरेश बाहुले यांनी आनंद व्यक्त केला आहे, तसेच राज्य संघटनेचे सेक्रेटरी, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आणि आंतरराष्ट्रीय पंच संजय प्रतापराव सरदेसाई आणि अध्यक्ष, अर्जुन पुरस्कारप्राप्त संजीवन भास्करन यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. या खेळाडूना संजय सरदेसाई यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत नवयुवक खिडकी संघ अजिंक्य



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा व सुधागड तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्री वरदायिनी क्रीडा मंडळ राबगावच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी नवयुवक खिडकी हा संघ ठरला.

द्वितीय क्रमांक मानकरी म्हसोबा शहापूर, तृतीय श्री विठ्ठल कोपरपाडा आणि चतुर्थ क्रमांक नवतरुण तळाघर संघाने प्राप्त केले. विजेत्या संघांना रोख रक्कम व व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत मालिकावीर म्हणून निर्देश डाके, उत्कृष्ट चढाईपटू अक्षय पाटील, उत्कृष्ट पकड करणारा संतोष जाईलकर आणि पब्लिक हिरो आकाश पाटील यांची निवड करण्यात आली व त्यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

# हॉकी वर्ल्डकपमध्ये कोरियाविरुद्ध जपानचे १२ खेळाडू उतरले मैदानात

## आंतरराष्ट्रीय महासंघाकडून होणार चौकशी

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

ओडिशा येथे सुरू असलेल्या विश्वचषक हॉकी स्पर्धेत मंगळवारी कोरियाविरुद्धच्या सामन्यात अखेरच्या सत्रात जपानचे १२ खेळाडू मैदानात होते. ही घटना लक्षात आल्यावर आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने याची चौकशी करण्याची तयारी दाखवली आहे.

ब गटातील या सामन्यात कोरियाने जपानचा २-१ असा पराभव केला. सामन्याच्या अखेरच्या सत्रात जपानचे १२ खेळाडू खेळले. या घटनेची आंतरराष्ट्रीय महासंघाकडून चौकशी होणार असली तरी सामन्याचा निकाल बदलणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जपान संघ व्यवस्थापनाने



सामन्यानंतर आपली चूक मान्य करताना माफी मागितली आहे.

हॉकी महासंघाच्या नियमाप्रमाणे सामन्यात ११ खेळाडूच खेळू शकतात. जपानने १२ खेळाडू कसे खेळवले हा चर्चेचा विषय ठरला आहे. सोमवारी न्यूझीलंडने नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्याला सुरुवात करतानाच गोलरक्षकाला वगळण्याचा निर्णय घेतला होता.






# मुंबई महापालिकेतर्फे मॅरेथॉन; २६ फेब्रुवारीला प्रोमो रन

**मुंबई : प्रतिनिधी**

आरोग्य, व्यायाम, क्रीडाप्रकार याबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी व व्यायामाचे महत्त्व नागरिकांना समजावे यासाठी मुंबई महापालिकेने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. नोव्हेंबर महिन्यात ही मुख्य मॅरेथॉन होणार असून पूर्वतयारी म्हणून येत्या २६ फेब्रुवारी रोजी प्रोमो रन होणार आहे. यामध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर पाच हजार नागरिकांना नोंदणी करता येणार आहे.

दरवर्षी खासगी कंपनीतर्फे मुंबई मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते, पण या वर्षीपासून प्रथमच महापालिकेच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. ही मुख्य स्पर्धा नोव्हेंबर महिन्यात होणार असून रंगीत तालीम स्वरूपाची स्पर्धा २६ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया या मोहिमेची सुरुवात ऑगस्ट २०१९मध्ये केली. आरोग्य, व्यायाम, विविध क्रीडाप्रकार याबाबत जनजागृती व्हावी आणि देशी क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेंतर्गत व आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी मुंबईमध्ये अर्ध मॅरेथॉनचे आयोजन करण्याचे निर्देश मनपाआयुक्त व प्रशासक इक्बाल सिंह चहल यांनी दिले होते. त्यानुसार फेब्रुवारी महिन्यात मुंबईमध्ये मॅरेथॉनसाठी पूर्वतयारी म्हणून प्रोमो रन होणार आहे.

# सानपाड्यात क्रिकेट स्पर्धा रंगली



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या भाजप आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त सानपाडा येथ अखिल भारतीय माथाडी कामगार संघटना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष युवा नेते पांडुरंग आमले यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट स्पर्धा रंगली.

नवी मुंबईस्तरीय खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत तुर्भे टायटन्स संघ विजेता ठरला. ऐरोली इव्हेंजर्स संघाने द्वितीय, तर सानपाडा सनरायजर्स संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

विजेत्या संघांना भाजपचे नवी मुंबई महामंत्री निलेश म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ जगताप, युवा नेते पांडुरंग आमले यांच्या हस्ते रोख रक्कम आणि चषक देऊन गौरविण्यात आले.

सानपाडा सेक्टर ९ येथील राणी लक्ष्मीबाई मैदानात सलग तीन दिवस ही क्रिकेट स्पर्धा खेळवण्यात आली. या वेळी चिंतामणी बेल्हेकर, सुधीर आंग्रे, विश्वास कनसे यांच्यासह मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com